



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक १७३ * नांदेड * मंगळवार, दि. ३० जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## टीईटी परीक्षा ऑनलाईन घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत होणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटी प्रकरणात भिवंडी पोलिसांनी अत्यंत मोठी कारवाई केली असून संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. टीईटी परीक्षेचे पेपर विक्री करण्यासाठी येणाऱ्या तिघांना पोलिसांनी रंगेहात ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून टीईटी परीक्षेचे प्रश्नपत्रिका संच जप्त करण्यात आले आहेत. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य शासनाने तातडीने पावले उचलली असून पुढील टीईटी आणि इतर परीक्षा ऑनलाईन घेण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येत आहे, अशी माहिती यावेळी दादा भुसे यांनी दिली.

याप्रकरणी भिवंडी येथील कोनगाव पोलीस ठाण्यात राजू प्रयाग शाम आणि इतर दोन आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे आरोपी मोठी रक्कम घेऊन पेपरची विक्री करणार होते. सदर गुन्ह्यात या ३ आरोपींना २७ जून रोजी अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे शिक्षण क्षेत्रात आणि परीक्षार्थींमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

भिवंडी पोलिसांनी केलेल्या या धडक कारवाईत बिहार आणि हरियाणातील तीन मुख्य आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. अटक करण्यात आलेल्यांमध्ये राजीव प्रयाग शाम (वय ४५, रा. पटना – बिहार), आकाश कुमार स्वराज कुमार (वय ३०, रा. पटना – बिहार) आणि धीरज बलराज सिंग (वय २८, रा. पानीपत – हरियाणा) यांचा समावेश आहे. आरोपींकडून उद्याच्या टीईटी परीक्षेचे चार प्रश्नपत्रिका संच जप्त करण्यात आले असून, हे पेपर विक्री करण्यासाठी तब्बल १.५ कोटी रुपयांचा मोठा आर्थिक व्यवहार होणार असल्याची धक्कादायक माहिती तपासात समोर आली आहे.

पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींची कसून झडती घेतली असता त्यांच्याकडे अनेक संशयास्पद वस्तू आढळल्या आहेत. आरोपींकडून मोबाईल फोन, डेबिट कार्ड, एटीएम कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, भारत व नेपाळमधील चलन, रोख रक्कम, बँकेचे चेक, प्रेस आयडी कार्ड तसेच लोक जनशक्ती पक्षाचे कार्ड आणि ओळख पटवणारी इतर कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. या रॅकेटमधील कपिल दहिया (हरियाणा) आणि बिजेंदर कुमार (पटना, बिहार) हे अन्य साथीदार अद्याप फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

या आंतरराज्य पेपरफुटी रॅकेटचे धागेदोरे बिहार, हरियाणा, दिल्ली, आग्रा तसेच इतर राज्यांपर्यंत पोहोचले असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. प्रकरणाचे गांभीर्य आणि व्याप्ती लक्षात घेऊन ठाणे पोलीस आयुक्तांच्या गुन्हे शाखेमार्फत या प्रकरणासाठी विशेष तपास पथक म्हणजेच 'डखढ' स्थापन करण्यात आले आहे. डीसीपी पवन बनसोड यांच्या नेतृत्वाखाली हे पथक राज्यभरातील आणि देशातील या नेटवर्कचा शोध घेत आहे.

हे रॅकेट अत्यंत संघटित पद्धतीने चालवले जात असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या गुन्ह्यातील आरोपींवर अत्यंत कडक कारवाई करण्यासाठी आणि रॅकेट पूर्णपणे उद्ध्वस्त करण्यासाठी 'मकोका' (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा) लावण्याच्या संदर्भात सध्या कायदेशीर तपासणी आणि पडताळणी सुरू आहे. तपासासाठी पोलिसांची विशेष पथके हरियाणा, बिहार आणि दिल्लीला रवाना झाली असून पुढील काही दिवसांत आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे.

## नसरापूर अत्याचार प्रकरणातील नराधम भीमराव कांबळेला फाशीची शिक्षा

**पुणे (प्रतिनिधी)–** पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या मुलीवर अत्याचार करून तिचा निर्दयीपणे खून करण्यात आल्याच्या खटल्यात आरोपी भीमराव कांबळे (वय ६५) याला (सोमवारी, ता २९) कोर्टाने फाशीची शिक्षा सुनावली आहे.

विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयाने मागे गुरुवारी (दि. २५) झालेल्या सुनावणीत कांबळेला या प्रकरणात दोषी ठरविले होते. त्यामुळे कांबळेला फाशी होणार की जन्मठेप, याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं. आज त्याला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे, गुन्हा घडल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांत निकाल लागला आहे. अत्याचार महिन्यांत खटल्याची सुनावणी पूर्ण आणि खून खटल्यात सर्वात जलदगतीने निकाली लागलेला हा राज्यातील पहिलाच खटला ठरला आहे. आरोपीला सोमवारी पुणे जिल्हा सत्र न्यायालयात विशेष न्यायाधीश एस. आर. साळूंखे यांनी फाशीची शिक्षा सुनावली आहे. विशेष सरकारी वकिल अजय मिसर यांनी भीमराव कांबळेला फाशीच्या शिक्षेची मागणी करताना त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनातील सर्वोच्च न्यायालयाचे १२ निकाल जोडले होते.

## जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी अनेकांचे उमेदवारी अर्ज दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी आमदार तुषार राठोड, दिलीप पाटील बेटमोगरेकर, भाजपचे श्रावण पाटील भिलवंडे, संगीता पाटील डक, प्रणिता देवरे, गंगाधर राठोड, अतुल वाघ आदी उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.




नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २३ संचालकांच्या निवडीसाठी निवडणूक होत आहे. मतदारसंघातून भाजपचे माजी पं.स.सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य बच्चेवार, रुपेश कुंटूरकर, राजेश देशमुख कुंटूरकर, बालाजी आनंदराव बावणे भोपाळकर, सूर्याजी चाडकर, दत्ता पाटील होटाळकर, बालाजी गंगासागरे यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यासोबतच अतुल वाघ यांनीही आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. प्रणिता देवरे- चिखलीकर, गंगाधर गोविंदराव राठोड, आमदार तुषार गोविंदराव राठोड, मारुती कवळे गुरुजी, शिवराज पाटील होटाळकर, दिलीप पाटील बेटमोगरेकर आदींनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

## मुख्य रस्त्यांवरील वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमित हातगाडीवर चालकावर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील मुख्य बाजारपेठा आणि शासकीय कार्यालय परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोइफोडे यांच्या आदेशानुसार अतिक्रमण निर्मूलन पथकाने सोमवारी विशेष धडक मोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांच्या निवासस्थानालगतच्या मुख्य रस्त्यावर बेकायदेशीरपणे हातगाडी लावून वाहतुकीस गंभीर अडथळा निर्माण करणाऱ्या शेख सोहेल शेख ताजोदिन या फळविक्रेत्यावर थेट फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी निवासस्थानालगतचा मुख्य रस्त्यावर संबंधित फळविक्रेत्याने मुख्य रस्त्याचा मोठा भाग व्यापून अवैध अतिक्रमण केले होते,



ज्यामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. मनपाचे अतिक्रमण निर्मूलन पथक पोलीस बंदोबस्तासह कारवाईसाठी पोहोचले असता, संबंधित हातगाडा चालकाने स्वतः च्या गाडीवरील सर्व फळे रस्त्यावर फेकून देऊन गोंधळ निर्माण केला. मनपा कर्मचाऱ्यांनी तातडीने जेसीबीच्या सहाय्याने संबंधित अतिक्रमित हातगाडी तोडून रस्त्यावरून पूर्णपणे बाजूला केली व रस्ता वाहतुकीसाठी मोकळा केला.

सदर कारवाईदरम्यान शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांचे कर्तव्य बजावण्यापासून रोखणे आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केल्याप्रकरणी मनपा प्रशासनाने कडक पाऊल उचलले आहे. संबंधित फळविक्रेत्याविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणल्याच्या कारणास्तव भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) संबंधित कलमांनुसार कलम २२१ अन्वये शिवाजीनगर पोलीस ठाण्यात एन.सी. आर. क्र.०२३९/२०२६ अन्वये दि.२९ रोजी गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

## मध्यवर्ती बसस्थानक परिसरातील चहा-कॉफी सेंटरला आग

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील मध्यवर्ती बसस्थानक परिसरातील एका चहा-कॉफी सेंटरला सोमवारी सकाळी अचानक आग लागल्याने काही काळ एकच खळबळ उडाली. भरदिवसा बसस्थानक परिसरात आग लागल्यामुळे प्रवासी व व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविल्याने मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, मुख्य बसस्थानकातील मॅजिक चहा कॉफी सेंटर या दुकानातून




अचानक धूर आणि ज्वाळा बाहेर येऊ लागल्या. याची माहिती मोहम्मद कोतवाल यांनी तातडीने महानगरपालिकेच्या अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाला दिली. माहिती मिळताच अधिकारी केरोजी दासरे, कांबळे व जवान अग्निशामक वाहनासह घटनास्थळी दाखल झाले. होज रीलच्या सहाय्याने पाण्याचा मारा करून त्यांनी काही वेळातच आग पूर्णपणे आटोक्यात आणली.

दुकानाचे मालक संजय बहादूरसिंग ठाकूर यांनी दिलेल्या माहितीनुसार, शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सुमारे १० बाय १० फूट आकाराच्या दुकानातील सिलिंग, फ्रिज, थर्मास, स्टीलची भांडी तसेच गॅस सिलेंडर आगीत जळून खाक झाले. या घटनेत अंदाजे ७ लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

आग वेळीच आटोक्यात आणल्यामुळे शेजारील दुकाने वाचविण्यात अग्निशमन दलाला यश आले.

## नरसिंगराव पावडे यांचे निधन; आज अंत्यविधी



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील भाग्यनगर येथील रहिवासी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते नरसिंगराव मोहनराव पावडे (८०) यांचे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने सोमवार, दि २९ जून रोजी दुपारी १. ३० वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज दि. ३० जून रोजी सकाळी ११ वाजता शांतीधाम गोवर्धन घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांची अंत्ययात्रा ही त्यांचे राहते घर भाग्यनगर येथून निघणार आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातू, असा परिवार आहे. ते राजश्री शाहू जुनिअर कॉलेज वसंतनगरचे संचालक होते. तर महानगरपालिकेचे ॲड. निलेश पावडे, मंगेश पावडे, उमेश पावडे यांचे वडील होत. तसेच नांदेड वाघाळा महानगरपालिकेचे माजी महापौर सौ. जयश्री निलेश पावडे यांचे ते सासरे होत.

## ५ जुलैपासून शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा होणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील बहुप्रतीक्षित शेतकरी कर्जमाफीच्या वितरणाचा मुहूर्त अखेर निश्चित झाला असून, आगामी ५ जुलैपासून पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार आहे, अशी माहिती राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सोमवारी विधानसभेत दिली.

यापूर्वी ३० जून रोजी कर्जमाफीची रक्कम दिली जाईल असे संकेत होते, मात्र तांत्रिक प्रक्रिया आणि राज्यपालांच्या स्वाक्षरीनंतर आता ५ जुलैनंतर प्रत्यक्ष निधी वाटप केले जाईल, असे मंत्र्यांनी स्पष्ट केले. राज्यातील ५६ लाख २४ हजार शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी दिली जाणार आहे.

मंत्री भरणे म्हणाले की, राज्यातील १ लाख ११ हजार शेतकऱ्यांना नव्या मोबाईल पच्या माध्यमातून खते उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या पचा वापर करताना काही तांत्रिक अडचणी येत असल्यास त्या तातडीने सोडवल्या जातील. तसेच, केंद्र सरकार आणि अन्य महत्त्वाच्या योजनांचा लाभ मिळवण्यासाठी 'फार्मर आयडी' अत्यंत गरजेचा आहे. राज्यातील सर्व शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार केले जाणार असून, यासाठी गावोगावी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

## पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचा हिंगोलीमधील तक्रारदारांशी 'संवाद'; आज नांदेडमध्ये जनसंवाद

**नांदेड (प्रतिनिधी)–** नागरिकांच्या तक्रारी समजावून घेऊन, त्यांचा जलद निपटारा करणे व पोलीस नागरिक यांच्यातील संवाद वाढवून, लोकाभिमुख कामकाजाद्वारे जनतेचा पोलिसांवरील विश्वास दृढ करणे, या उद्देशाने पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे. याच पार्श्वभूमीवर उमाप मंगळवारी नांदेड पोलीस अधीक्षक कार्यालयात तक्रारदारांची संवाद साधणार आहे.

परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी, पोलीस उपमहानिरीक्षक हे प्रत्येक




महिन्यास जिल्हा मुख्यालयांना भेटी देत असतात. यादरम्यान, त्या-त्या जिल्ह्यातील तक्रारदारांना प्रत्यक्ष भेटून, त्यांच्या तक्रारी व अडीअडचणी समजावून घेऊन, त्या तत्परतेने सोडवण्याचा पोलीस उप महानिरीक्षक यांचा प्रयत्न आहे.

दि. २९ जून रोजी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी, पोलीस अधीक्षक, हिंगोली कार्यालयात जिल्हा पोलिसांच्या कामकाजाचा मासिक आढावा घेतल्यानंतर, दुपारी २.३० ते ४ या वेळेत जिल्ह्यातील तक्रारदारांशी संवाद साधला. यादरम्यान, एकूण (१३) तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पोलीस उपमहानिरीक्षक यांना सोपविले. यात, मारहाणी बाबत, सायबर फसवणूक, दाखल गुन्ह्यांचा तपास इत्यादी तक्रारीचा समावेश आहे.

सदर दिवशी, प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन, त्यांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जाच्या शिघ्र सोडवणुकीसाठी, पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच 'संवेदना' ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. आज रोजी 'जनसंवाद' उपक्रमादरम्यान, प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फिडबॅक टीममार्फत घेण्यात येणार आहे.

यावेळी पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा, अपर पोलीस अधीक्षक कमलेश मीना, उपविभागीय पोलीस अधिकारी वसमत व शहरातील पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी हे उपस्थित होते.




## वटपौर्णिमेनिमित्त एकल महिलांच्या हस्ते वटवृक्षारोपण; पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश




**नांदेड (प्रतिनिधी)–** युनिव्हर्सल एज्युकेशनल, कल्चरल अँड सोशल सोसायटी यांच्यावतीने वटपौर्णिमेच्या पावन निमित्ताने परंपरेतून पर्यावरणाकडे या संकल्पनेवर आधारित एक अभिनव उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात परिसरातील सुमारे २५ ते ३० एकल महिलांच्या हस्ते वटवृक्षाचे रोप लावून पर्यावरण संवर्धनाचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला.

या कार्यक्रमाला जिल्हा बाल संरक्षण अधिकारी विद्या आळणे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच स्वप्ना कुलकर्णी, सिंगल मदर ग्रुपच्या समन्वयक, यांचीही विशेष उपस्थिती लाभली. यावेळी उपस्थित महिलांनी वडाच्या झाडाची पारंपरिक पूजा करण्याबरोबरच एक महिला एक वृक्ष हा संकल्प स्वीकारला. वाढते प्रदूषण, कमी होत चाललेली वृक्षसंख्या आणि पर्यावरण संरक्षणाची गरज लक्षात घेऊन प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन करण्यात आले.कार्यक्रमात मार्गदर्शन करताना कार्यक्रमाच्या संयोजक ज्योतकौर जितेंद्रसिंह पहाडिया यांनी सांगितले की, वटपौर्णिमेला आपण पतीच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करतो, परंतु निरोगी आयुष्यासाठी शुद्ध हवा आणि वृक्षही तितकेच आवश्यक आहेत. त्यामुळे वडाची पूजा करण्याबरोबरच वटवृक्ष लावणे ही काळाची गरज आहे. परंपरा जपत पर्यावरणाचे संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.या उपक्रमातून एकल महिलांच्या आत्मविश्वासाला बळ देतानाच पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी सामाजिक संदेश देण्यात आला. उपस्थित सर्व महिलांनी भविष्यात अधिकाधिक वृक्ष लागवड व संवर्धन करण्याची शपथ घेतली.



**जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे**
**शहाणे करूनी सोडावे, सकळ जन**

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

**गोदातीर समाचार**

**संपादक**
**केशव घोणसे पाटील**


# जन्मदरातील घसरण : एक नवे आव्हान

लोकसंख्या वाढीमध्ये आपण चीनलाही मागे टाकले हे जरी खरे असले तरी आता हे चित्र पुन्हा बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे देखील वेगळ्या प्रकारची समस्या निर्माण होत असते. सध्या तरी आपल्या देशामध्ये लोकसंख्या वाढीचा घटलेला दर हा चिंतनाचा विषय ठरला आहे. लोकसंख्या वाढ ही अनेक दशकांपासून भारतासमोरील प्रमुख समस्या मानली जात होती. वाढती लोकसंख्या, मर्यादित संसाधने, रोजगाराचा तुटवडा आणि विकासावरील वाढता ताण यामुळे लोकसंख्या नियंत्रणाच्या धोरणांना प्राधान्य देण्यात आले. मात्र, काळाच्या ओघात परिस्थिती बदलली आहे. आता अनेक राज्यांमध्ये जन्मदर घसरू लागला आहे की, भविष्यात कार्यक्षम मनुष्यबळाची कमतरता निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मध्य प्रदेश सरकारने दोनपेक्षा अधिक अपत्ये असलेल्या नागरिकांवरील सरकारी नोकरीची अट रद्द करण्याचा घेतलेला निर्णय या बदलत्या वास्तवाचीच जाणीव करून देतो. सन २००१ मध्ये मध्य प्रदेशाने दोन मुलांच्या अटीचा नियम लागू केला होता. त्या काळात राज्याचा प्रजनन दर ३.९ इतका होता. लोकसंख्यावाढीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अशा प्रकारच्या उपाययोजना आवश्यक वाटत होत्या. परंतु शिक्षणाचा प्रसार, शहरीकरण, महिलांचे सक्षमीकरण, आरोग्य सुविधांमधील सुधारणा आणि कुटुंब नियोजनाच्या प्रभावी मोहिमांमुळे परिस्थितीत आमूलाग्र बदल झाला. आज मध्य प्रदेशाचा प्रजनन दर २.० वर आला आहे. म्हणजेच राज्याने लोकसंख्या स्थिरतेच्या उंबरठ्यावर प्रवेश केला आहे. लोकसंख्याशास्त्रानुसार २.१ हा प्रतिस्थापन प्रजनन दर मानला जातो. या पातळीखाली जन्मदर गेल्यास दीर्घकालीन काळात लोकसंख्या घटण्यास सुरुवात होते. एकेकाळी लोकसंख्या वाढीची चिंता करणाऱ्या सरकारांना आता उलट लोकसंख्या घटण्याची चिंता सतावू लागली आहे. आंध्र प्रदेशसारख्या राज्यांनी तर अधिक मुले असलेल्या कुटुंबांना प्रोत्साहन देण्याचे संकेत दिले आहेत. कारण कमी होत जाणारी तरुणांची संख्या आणि वाढणारी वृद्ध लोकसंख्या आर्थिक विकासासाठी गंभीर आव्हान ठरू शकते. जगातील अनेक देशांनी या समस्येचे दुष्परिणाम अनुभवले आहेत. चीनचे उदाहरण याबाबत विशेष उल्लेखनीय आहे. एक मूल धोरणामुळे लोकसंख्यावाढीवर नियंत्रण मिळाले; परंतु त्याचवेळी जन्मदरात मोठी घट झाली. परिणामी, चीनसमोर वृद्धत्वाकडे झुकणारी लोकसंख्या आणि घटणारे कार्यबल अशी दुहेरी समस्या उभी राहिली. त्यामुळे चीनला आपले धोरण बदलून दोन आणि नंतर तीन मुलांना परवानगी द्यावी लागली. जपान आणि दक्षिण कोरियासारख्या विकसित देशांनाही कमी जन्मदरामुळे अर्थव्यवस्थेवर आणि सामाजिक व्यवस्थेवर मोठा ताण सहन करावा लागत आहे. फ्रान्समध्ये तर परिस्थिती याहीपेक्षा भयानक आहे. त्या ठिकाणी बाजारात कुठेही संतती प्रतिबंधक साधनं मिळत नाहीत. भारताची परिस्थिती सध्या तुलनेने अनुकूल असली तरी सावध राहण्याची गरज आहे. देशाचा एकूण प्रजनन दर १.९ पर्यंत घसरला आहे. काही राज्यांमध्ये हा दर प्रतिस्थापन पातळीपेक्षाही कमी झाला आहे. याचा अर्थ आगामी काही दशकांमध्ये भारतालाही वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण वाढण्याच्या समस्येला सामोरे जावे लागू शकते. अर्थात अशा लोकांच्या पेन्शनवरील खर्च हा एक डोकेदुखीचा प्रश्न ठरू शकतो. सध्या भारताची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्याची युवा लोकसंख्या. ही लोकसंख्या रोजगार, कौशल्य विकास आणि उत्पादनक्षमतेच्या माध्यमातून देशाला आर्थिक महासत्ता बनवू शकते. मात्र, त्यासाठी योग्य नियोजन आवश्यक आहे. मध्य प्रदेशाचा निर्णय हा केवळ प्रशासकीय बदल नसून लोकसंख्येबाबतच्या नव्या विचारसरणीचा संकेत आहे. बदलत्या सामाजिक आणि आर्थिक वास्तवाशी सुसंगत धोरणे स्वीकारणे ही काळाची गरज आहे. लोकसंख्या ही ना ओझे आहे, ना केवळ आकड्यांचा खेळ. ती राष्ट्राच्या विकासाची सर्वात महत्त्वाची शक्ती आहे. त्यामुळे लोकसंख्येचे व्यवस्थापन करताना दीर्घकालीन राष्ट्रीय हित, मानवी संसाधनांचा विकास आणि भावी पिढ्यांच्या गरजा यांचा समतोल राखणे हेच भारतासमोरील खरे आव्हान ठरणार आहे. लोकसंख्या धोरणाचा उद्देश केवळ जन्मदर वाढविणे किंवा कमी करणे हा नसतो. त्यामागील मुख्य हेतू संतुलित लोकसंख्या रचना निर्माण करणे हा असतो. पुरेसे तरुण कार्यबल, सक्षम अर्थव्यवस्था, वृद्धांच्या गरजांची पूर्तता आणि संसाधनांचा समतोल वापर यांचा विचार करून धोरणे आखावी लागतात. त्यामुळे आज भारताला लोकसंख्या नियंत्रणाच्या जुन्या चौकटीबाहेर विचार करण्याची गरज आहे.

# महाकर्जमाफीच्या अंमलबजावणीला वेग; लाभार्थ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार



महाराष्ट्राची संपूर्ण अर्थव्यवस्था आणि संस्कृती ही कृषी क्षेत्राभोवती फिरते. परंतु, गेल्या काही वर्षांत निसर्गाचे चक्र पूर्णपणे बदलले आहे. कधी अवेळी येणारा पाऊस, कधी तीव्र दुष्काळ, तर कधी गारपीट, अतिवृष्टी आणि महापूर... एकामागून एक येणाऱ्या या नैसर्गिक संकटांमुळे राज्यातील बळिराजा पुरता कोलमडून गेला आहे. कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या या शेतकरी बांधवांला पुन्हा पायावर उभे करण्यासाठी राज्य शासनाने एक अत्यंत धाडसी आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. ते म्हणजेच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'.ही योजना केवळ एक तात्पुरती कर्जमुक्ती नसून, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना सन्मानाने जगण्याची आणि नव्या उमेदीने शेती करण्याची संधी देणारी 'नवसंजीवनी' ठरणार आहे.

**महाकर्जमुक्तीची अंमलबजावणी अंतिम टप्प्यात**

राज्य शासनाची आजवरची सर्वात मोठी महाकर्जमुक्ती योजना म्हणून या योजनेकडे पाहिले जात आहे. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आली आहे. प्रशासकीय पातळीवर सर्व तयारी पूर्ण झाली असून, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या थेट कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार आहे.

या निर्णयामुळे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर लाखो शेतकरी कुटुंबांना खूप मोठा दिलासा मिळणार आहे.

**योजनेचे त्रिसूत्र कर्जमुक्ती एकवेळा समजोता आणि प्रोत्साहनपर लाभ**

या योजनेचे स्वरूप केवळ कर्जमुक्ती नाही तर, विविध प्रवर्गातील शेतकऱ्यांचा विचार करून याची अत्यंत अभ्यासपूर्ण आखणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने तीन घटकांचा समावेश आहे.

यात २ लाख रुपयांपर्यंत संपूर्ण कर्जमुक्ती: जे शेतकरी थकबाकीदार आहेत, अशा पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा थेट लाभ दिला जात आहे. यापूर्वीच्या 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने'चे लाभार्थी असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठीही शासनाने यात विशेष व स्वतंत्र तरतूद केली आहे.

एकवेळ समझोता योजना (OTS): ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी 'वन टाईम सेटलमेंट' (OTS) म्हणजेच एकवेळ समझोता योजना लागू करण्यात आली आहे. यात शेतकऱ्यांनी

आपल्या हिश्शाची रक्कम भरल्यानंतर, राज्य शासन कर्जमुक्ती रक्कम थेट शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन: अनेक शेतकरी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही बँकेच्या कर्जाची नियमित परतफेड करतात. अशा प्रामाणिक कर्जदार शेतकऱ्यांमध्ये अन्यायाची भावना निर्माण होऊ नये, म्हणून शासनाने त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे.

**डिजिटल तंत्रज्ञान आणि पारदर्शकता**

कर्जमुक्तीयोजनेच्या अंमलबजावणी-मध्ये तांत्रिक अडचणी आणि दिरंगाई होऊ नय यास राज्य शासनाने 'महाआयटी'च्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवली आहे.

सर्व बँकांकडून पात्र कर्जखात्यांचा तपशील थेट पोर्टलवर घेतला जात असून, संगणकीय पडताळणीद्वारे अंतिम याद्या तयार केल्या जात आहेत. या याद्या शेतकऱ्यांना सहज पाहता याव्यात यासाठी गाव चावडी, ग्रामपंचायत, बँक शाखा, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्र येथे प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे, पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर बँकांमार्फत संदेश पाठवूनही सूचित केले जाणार आहे.

**शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आवाहन 'आधार प्रमाणिकर' अनिवार्य**

शेकऱ्यांनीयोजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन, पारदर्शक आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवण्यात आली आहे. पात्र शेकरनी यादीत नाव आल्यानंतर लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या आधार नंबर किंवा यादीतील विशिष्ठ नंबरसह 'आपले सरकार सेवा केंद्रात' किंवा बँकेत जाऊन आपल्या कर्जखात्याचे बायोमेट्रिक/आधार प्रमाणीकरण करणे गरजेचे आहे. ही माहिती योग्य असल्याची खात्री करून शेतकऱ्यांनी मान्यता दिली, की शासनाकडून थेट कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल. आणि एकवेळ समझोता (OTS) योजनेतील लाभार्थ्यांनी प्रथम त्यांचा हिश्शाची रक्कम भरणे आवश्यक आहे, त्यानंतरच शासनाचा कर्जमुक्तीचा लाभ शेकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल.यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे.

**तक्रार निवारणासाठी सक्षम यंत्रणा**

योजनेच्या पारदर्शकतेवर शासनाने विशेष भर दिला आहे. कर्जखात्याच्या माहितीत किंवा बँक तपशीलात काही तांत्रिक त्रुटी असल्यास शेतकऱ्यांना दाद मागता यावी, म्हणून सक्षम तक्रार निवारण व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. तसेच या तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष समितीसुद्धा नियुक्त करण्यात आली आहे.

**प्रशासकीय समन्वय**

सहकार विभाग, जिल्हाधिकारी, बँका, महाआयटी, ग्रामपंचायती आणि स्थानिक प्रशासन या सर्व घटकांमध्ये राज्य शासनाने अचूक समन्वय साधला आहे. विविध स्तरांवर कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिल्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि गतिमान झाली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ च्या माध्यमातून राज्यातील लाखो शेतकरी पुन्हा एकदा 'कर्जमुक्त' होऊन 'कर्जपात्र' होणार आहेत. त्यांना नवीन पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू कर्जमुक्तीचा लाभ राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला एक नवी गती, नवी ऊर्जा आणि बळिराजाला सन्मानाने जगण्याचा नवा विश्वास देणारा ठरणार आहे.

**-काशीबाई थोरात-धायगुडे**
वरिष्ठ सहायक संचालक मंत्रालय, मुंबई

# प्रेम, अपेक्षा आणि हिंसेच्या उंबरठ्यावर उभा समाज

पुण्यातील केतन अग्रवाल हत्याकांडाने समाजमनाला मोठा धक्का दिला आहे. प्रेमसंबंध, वैवाहिक तणाव किंवा वैयक्तिक मतभेद यांचा शेवट थेट खुनासारख्या अमानुष गुन्ह्यात होत असेल, तर हा केवळ एका कुटुंबाचा किंवा एका शहराचा प्रश्न राहत नाही. तो संपूर्ण समाजाच्या मानसिक, नैतिक आणि सांस्कृतिक आरोग्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा विषय ठरतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रकरणाकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून नव्हे, तर सामाजिक प्रश्न म्हणून पाहण्याची गरज व्यक्त केली आहे. ही भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.



गेल्या काही वर्षांत देशभरात प्रेम संबंध, विवाहबाह्य संबंध, वैवाहिक मतभेद किंवा आर्थिक हितसंबंध यांच्या पार्श्वभूमीवर घडलेल्या हत्यांची संख्या चिंताजनकरीत्या वाढत आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्युरोच्या आकडेवारीनुसार प्रेमसंबंध, अनैतिक संबंध आणि कौटुंबिक वाद ही भारतातील हत्यांची प्रमुख कारणे ठरत आहेत. मेघालयातील राजा रघुवंशी प्रकरण, मेरठचा ब्ल्यू ड्रम हत्याकांड, दिलीप यादव, धन्नालाल सैनी किंवा देहराडूनमधील राजेश-अनुपमा प्रकरण ही केवळ गुन्हेगारी वृत्ते नाहीत; ती समाजातील नातेसंबंधांच्या ढासळत्या वास्तवाची भयावह उदाहरणे आहेत.

मूळ प्रश्न असा आहे की, ही वाढती हिंसा नेमकी कुठून जन्म घेते? ही केवळ गुन्हेगारी प्रवृत्ती आहे का, की त्यामागे सामाजिक आणि मानसिक कारणांची गुंतागुंत आहे. आजची तरुण पिढी अधिक शिक्षित, आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आणि स्वतःचे निर्णय घेण्यास सक्षम झाली आहे. ही सकारात्मक बाब असली, तरी अपेक्षाही त्याच प्रमाणात वाढल्या आहेत. प्रेमसंबंध असोत किंवा विवाह, प्रत्येक गोष्ट आपल्या कल्पने-प्रमाणेच घडावी, अशी मानसिकता बळावत चालली आहे. नात्यात मतभेद, नकार किंवा तडजोड स्वीकारण्याची क्षमता कमी होत आहे. माझेच खरे हा अहंकार अनेकदा विवेकावर मात करतो आणि त्यातून सूड, कटकारस्थान व हिंसा जन्माला येते.

यामागील आणखी एक गंभीर कारण म्हणजे पालक आणि मुलांमधील वाढती संवादाची दरी. करिअर, स्पर्धा आणि डिजिटल जीवनशैलीच्या गडबडीत घरातील संवाद कमी झाला आहे. मुलांच्या भावनिक संघर्षाची जाणीव पालकांना होत नाही, तर पालकांचा अनुभव आणि मार्गदर्शन मुलांपर्यंत पोहोचत नाही. परिणामी, अनेक तरुण निर्णय भावनेच्या भरात घेतात आणि त्याचे दुष्परिणाम संपूर्ण आयुष्यभर भोगावे लागतात. समाजमाध्यमे, वेब मालिका आणि चित्रपटांचाही या प्रक्रियेत काही प्रमाणात प्रभाव नाकारता येणार नाही.

अनेक कथांमध्ये हिंसा, सूड आणि गुन्हेगारी यांचे आकर्षक चित्रण केले जाते. त्यामुळे हिंसेबद्दलची संवेदनशीलता कमी होत असल्याची चिंता मानसशास्त्रज्ञ व्यक्त करतात. अर्थात, प्रत्येक गुन्ह्यासाठी माध्यमांनाच दोष देता येणार नाही; मात्र वास्तविक आणि आभासी जगातील सीमारेषा धूसर होत चालल्याचे चित्र निश्चितच चिंताजनक आहे. याच पार्श्वभूमीवर हनीमून से हत्यासारख्या मालिकांनी गुन्ह्यांच्या पाठीमागील मानसिक, सामाजिक आणि वैवाहिक दबावांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. गुन्हेगाराला शिक्षा मिळणे आवश्यक आहेच; पण अशा घटना घडण्यामागील कारणांचा शोध घेणे त्याहून अधिक आवश्यक आहे.

या समस्येवर उपाय केवळ कठोर कायदे किंवा जलद न्यायव्यवस्था हेच असू शकत नाहीत. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये भावनिक साक्षरता, नातेसंबंधांचे व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्य याविषयी मार्गदर्शन आवश्यक आहे. समुपदेशन केंद्रे अधिक सक्षम करणे, पालक-मुलांमध्ये संवाद वाढविणे, विवाहपूर्व समुपदेशनाला प्रोत्साहन देणे आणि समाजमाध्यमांचा जबाबदारीने वापर करण्याची जाणीव निर्माण करणे ही काळाची गरज आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्रेमाचा अर्थ पुन्हा समजावून सांगण्याची वेळ आली आहे. प्रेम म्हणजे मालकी हक्क नाही, तर परस्परांचा सन्मान, विश्वास आणि त्याग आहे. नात्यातील मतभेद हिंसेने नव्हे तर संवादाने सोडवले जातात, ही संस्कृती रुजवावी लागेल. संतवचनातील प्रेम लाभे प्रेमळा, त्याग ही त्याची कसोटी हा संदेश आजच्या समाजासाठी पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाचा ठरतो.

केतन अग्रवालसारख्या घटना समाजाला केवळ हळहळ व्यक्त करण्यासाठी नसतात; त्या आत्मपरीक्षणाची संधी असतात. जर आजही आपण या घटनांकडे फक्त गुन्हे म्हणून पाहिले, तर उद्या अशाच अनेक शोकांतिका घडत राहतील. त्यामुळे कायद्याबरोबरच कुटुंब, शिक्षणव्यवस्था, समाज आणि माध्यमे यांनीही आपली जबाबदारी ओळखण्याची हीच योग्य वेळ आहे. कारण सुरक्षित समाजाची सुरुवात सुदृढ नातेसंबंधांपासूनच होते.

**-मच्छिंद्र ऐनापुरे**
जत जि. सांगली

# लहान ग्रहांना लघुग्रह म्हणायची प्रथा!

आंतरराष्ट्रीय लघुग्रह दिवस हा वार्षिक जागतिक कार्यक्रम आहे जो १९०८ मध्ये तुंगुस्का घटनेच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित केला जातो, जेव्हा एक लघुग्रह सुमारे २,१५० चौरस किमी- ८३० चौ.मैल सायबेरियातील जंगलात समतल होता. तो संयुक्त राष्ट्र संघाने आपल्या ठरावात दरवर्षी ३० जून रोजी जागतिक स्तरावर पाळण्याची घोषणा केली आहे. लघुग्रह दिनाचे उद्दिष्ट लघुग्रहांबद्दल जागरुकता वाढवणे, पृथ्वी व तिचे कुटुंब, समुदाय आणि भविष्यातील पिढ्यांचे आपत्तीजनक घटनेपासून संरक्षण करण्यासाठी काय केले जाऊ शकते? याविषयी ज्ञानवर्धक लेख वाचकांसाठी प्रकाशित करीत आहोत.

लघु म्हणजे लहान आणि सूर्याभोवती फिरणाऱ्या या ग्रहांना लघुग्रह असे नाव आहे. स्वत:च्या गुरुत्वाकर्षणाखाली गोलाकार होण्यासाठी या वस्तूंचे वस्तुमान पुरेसे नसल्याने, लघुग्रह अनियमित आकाराचे राहिले आहेत. लघुग्रहांचे आकार धुलीकणांपासून ते शेकडो किलोमीटर आकाराच्या टेकडी, डोंगर, पर्वता एवढे जरी असले, तरी यातल्या एक मीटरहून लहान आकाराच्या वस्तूंना अशनी किंवा उल्का- मिटिअरॉइड म्हणतात. एक मीटरपेक्षा अधिक लांब-रुंद ग्रहांनाच लघुग्रह म्हणायची प्रथा आहे. पण सेरीस या सर्वांत मोठ्या लघुग्रहाला बटुग्रह किंवा खुजाग्रह अशा एका वेगळ्या गटांत आता सामील केले गेले आहे. लघुग्रह संख्येने कोट्यवधी असले, तरी मार्च २०२० पर्यंत आंतराष्ट्रीय खगोलशास्त्र संघ- आय.ए.यू. इंटरनॅशनल स्ट्रॉनॉमी युनियनच्या यादीत नावानिशी नोंद केलेले, ज्यांची कक्षा, आकार आणि वर्णपटावरून अंदाजे रासायनिक जडणघडण माहीत झालेले, एकूण नऊ लाख सत्तावन हजार सातशे बेचाळीस लघुग्रह ज्ञात आहेत. बहुसंख्य लघुग्रहांच्या सूर्याभोवती असलेल्या परिभ्रमण कक्षा सर्वसाधारणपणे मंगळ आणि गुरू ग्रहांच्या कक्षांच्या दरम्यान आहेत. त्यामुळे या जागेला लघुग्रहांचा पट्टा असे म्हणतात. काही लघुग्रह गुरूच्याच कक्षेत त्याच्या पुढे आणि मागे आहेत. यांना ट्रोजन-लघुग्रहांचा गट म्हणतात. काही लघुग्रह नेपच्यून ग्रहाच्या कक्षेपलीकडेही आहेत. त्यांना लघुग्रहांचा क्यूपर-पट्टा असे म्हणतात. काही लघुग्रहांच्या विकेंद्री कक्षा पृथ्वीकक्षेला छेदून जाणाऱ्या आहेत. त्यांचे अपसूर्य स्थान- लंबवर्तुळाकार कक्षेतील ग्रहांचे सूर्यापासून सर्वात दूरचे स्थान; याला अपसूर्य बिंदू असे म्हणतात, जरी मंगळापलीकडचे असले, तरी उपसूर्य स्थान- लंबवर्तुळाकार कक्षेतील वस्तूचे सूर्यापासून सर्वात जवळ-चे स्थान, याला उपसूर्य बिंदू असे म्हणतात. शुक्राच्या कक्षेहूनही कित्येकदा कमी असते. अशा लघुग्रहांना पृथ्वीसमीप-लघुग्रह गट असे आता नव्याने संबोधण्यात येते.

लघुग्रहांचे साधारणतः तीन प्रकार पडतात- १. कार्बन बहुलता असणारे, २. सिलिकेटने बनलेले, ३. धातूंची बहुलता असणारे. सूर्य आणि ग्रहमाला ज्या आंतरतारकीय रेणवीय मेघापासून निर्माण झाले, त्या मेघातून त्याचवेळी लघुग्रहांची निर्मिती झाली असावी. मंगळ आणि गुरू ग्रहांच्या गुरुत्वीय आकर्षणामुळे येथे एक मोठा ग्रह निर्माण होऊ शकला नसावा, अशी लघुग्रह निर्मितीबाबत संकल्पना आहे.

प्रत्येक लघुग्रहाचे परिवलन वेगवेगळ्या गतीने चालू आहे आणि प्रत्येकाच्या आसाची दिशाही निरनिराळी आहे. लघुग्रह हे मोठे खडक आहेत, जे सूर्याभोवती फिरतात. ४.६ अब्ज वर्षांपूर्वी आपल्या सूर्यमालेच्या जन्मादरम्यान हे अंतराळ दगड तयार झाले. सूर्यमालेच्या सुरुवातीच्या काळात धूलिकणांचे गुच्छ बनले. प्लॅनेटेसिमल म्हणून ओळखले जाणारे हे गठ्ठे त्यांच्याद्वारे अधिक धूळ आकर्षित करून मोठे आणि मोठे झाले, गुरुत्वीय क्षेत्रे बनले. यापैकी काही इतके मोठे झाले की ते ग्रह बनले. इतर लघुग्रह बनले. काही लघुग्रह इतर लघुग्रहांशी आदळले आणि लहान तुकडे झाले, तर काही मोठे राहिले. सर्वात मोठे लघुग्रह अनेक मैल मोजू शकतात. उदाहरणार्थ, ६५ दशलक्ष वर्षांपूर्वी डायनासोर नष्ट करणारा लघुग्रह सात मैल पसरला होता.

आपल्या सौरमालेमध्ये दोन लघुग्रह महामार्ग आहेत. गुरू आणि मंगळ यांच्यातील मुख्य लघुग्रह पट्टा आणि नेपच्यूनच्या कक्षेबाहेर फिरणारा



कुईपर बेल्ट. नासाच्या मते एकट्या मुख्य लघुग्रह पट्ट्यात १.१ ते १.९ दशलक्ष लघुग्रह आहेत. लहान लघुग्रह पृथ्वीच्या वातावरणात नेहमीच प्रवेश करतात, परंतु सहसा ते जळून जातात. ग्रहव्यापी आपत्ती निर्माण करणारे प्रचंड लघुग्रह अत्यंत दुर्मिळ आहेत. याचे कारण असे की गुरूचे गुरुत्वाकर्षण खेचणे, जे पृथ्वीपेक्षा ११ पट रुंद आहे, ते आपल्या ग्रहावर पोहोचण्यापूर्वी त्यांना शोषून घेते. तथापि, फुटबॉल मैदानाच्या आकाराचे मोठे लघुग्रह अधूनमधून आत सरकतात, दर २,००० वर्षांनी एकदा. जेव्हा हे लघुग्रह आदळतात, तेव्हा ते सहसा ज्या भागात उतरतात त्याच भागाचे नुकसान करतात. तथापि, ते महासागरात उतरल्यास त्सुनामीला चालना देऊ शकतात, ज्यामुळे किनारी भागांचा नाश होऊ शकतो. लघुग्रह आपल्याला इतका धोका देत नाहीत, आपण अद्याप त्यांच्यासाठी तयार असणे आवश्यक आहे. म्हणूनच तुंगुस्का स्फोटाच्या स्मरणार्थ दर ३० जून रोजी आंतरराष्ट्रीय लघुग्रह दिन साजरा केला जातो, जो २,००० चौरस किलोमीटर नष्ट केले. रशियातील तुंगुस्का येथील वाळवंट खूप महत्त्वाचे आहे. या दिवसाची स्थापना २०१६मध्ये युनायटेड नेशन्सने लघुग्रहांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि आपल्या ग्रहाचे त्यांच्यापासून संरक्षण करण्यासाठी केली होती, हे लक्षात घ्यावे. विश्व लघुग्रह दिवसानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

**-कृष्णकुमार निकोडे**
गडचिरोली.
मो. ७१३२७९६६८३

# शाळेच्या दर्शनी भागात शैक्षणिक शुल्काबाबत माहिती देणारे फलक सर्व शाळांनी लावावेत

## जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या सुचना

**नांदेड (प्रतिनिधी)–** मागील काही दिवसांपासून जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमाच्या व मराठी माध्यमाच्या स्वयंअर्थसहायित तत्त्वावर चालणाऱ्या शाळांच्या बाबतीत शैक्षणिक शुल्क व शालेय गणवेश आणि पुस्तके खरेदीसाठी बऱ्याच तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील स्वयं-अर्थसहायित तत्त्वावर चालणाऱ्या सर्व शाळांनी महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम-२०११ मध्ये दिलेल्या सूचनेनुसार कार्यकारी समितीचे गठण करुन कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये सर्व वर्गांची शैक्षणिक शुल्क निश्चिती करण्यात यावी व अशा आशयाचे फलक सर्वांना दिसेल अशा ठिकाणी शाळेच्या दर्शनी भागात लावण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिल्या आहेत.



तसेच या बाबतीत सर्व शाळा व्यवस्थापन अनुपालन करत आहेत किंवा नाही यावर नजर ठेवण्यासाठी सर्व गटशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी यांना सूचना दिल्या आहेत.

शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांना स्कूल युनीफॉर्म, स्कूलबॅग, स्कूल शूज तसेच पुस्तके इत्यादी शाळेतून अथवा ठराविक दुकानातून खरेदी करण्याची सक्ती करु नये.

स्वयंअर्थसहायित शाळा ज्या मंडळाशी संलग्नित आहेत त्या मंडळाच्या अधिकृत पुस्तकांचा वापर शाळेच्या दैनंदिन अध्ययन अध्यापनात करावा. इतर प्रकाशनाची पुस्तके वापरू नयेत. तसेच त्यांच्या खरेदीचा आग्रह पालकांना करु नये.

या सूचनांचे अनुपालन करुन जिल्ह्यातील स्वयंअर्थसहायित तत्त्वावर चालणाऱ्या इंग्रजी, मराठी व इतर सर्व माध्यमाच्या व व्यवस्थापनाच्या शाळांनी शाळेच्या दर्शनी भागामध्ये पुढीलप्रमाणे फलक लावावा. सदर फलकामध्ये संस्थेचे नाव, शाळेचे नांव पूर्ण पत्यासह, युडायस क्रमांक, परीक्षा मंडळाचे नाव व मंडळ संकेतांक क्रमांक, शाळेचा शासन मान्यता आदेश, मान्य वर्गापासून पर्यंत, वर्गनिहाय कार्यकारी समितीने निश्चित केलेली वार्षिक शैक्षणिक शुल्क दर याप्रमाणे फलक लावून त्याच्या फोटोसह अहवाल गटशिक्षणाधिकारी यांचे मार्फत शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयास सादर करावा, अशी सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील सर्व शाळांना दिली आहे.

## मुदखेडमध्ये ६५ दिव्यांगांना कृत्रिम अवयवांचे वाटप

**मुदखेड (प्रतिनिधी)–** एस. आर. ट्रस्ट, मध्यप्रदेश व ऑलिमको, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने अंकुर शिक्षण संस्था नांदेड संचलित निवासी मूकबधिर विद्यालय, मुदखेड येथे दिव्यांग व्यक्तींसाठी कृत्रिम हात, पाय, कॅलिपर्स आदी सहायक उपकरणांचे मोजमाप व तत्काळ वितरण शिबीर उत्साहात पार पडले. या शिबिरामुळे अनेक दिव्यांगांना स्वावलंबनाकडे वाटचाल करण्यासाठी नवी उमेद मिळाली.

शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहायक आयुक्त दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी अवधूत गंजेवार, गटविकास अधिकारी शेखर देशमुख, संस्थेचे सचिव संग्राम सूर्यवंशी, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी निलेश बांगाळे, संताजी भाडेकर, एस. आर. ट्रस्ट संचालक डॉ. रूपेश जाधव, ऑलीम को. मुंबईचे आकाश यादव यांच्यासह प्रहार संघटनेचे अनिल शेटे, माधव पांचाळ, केशरताई शिंदे, गोविंदराव लोणे, साहेबराव निवडंगे, शंकर शिंदे, नागोराव निखाते यांची उपस्थिती होती.

शाळेचे मुख्याध्यापक हनमंत गवलवाड, सौ. सुनिता सूर्यवंशी, भास्कर वाघ, गणेश बामणे, सतीश हजारे, कैलास जामुंदे, नागरबाई वाडेकर, दत्ता हसेवाड, गजानन शिंदे व विठ्ठल बोरगे यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

# ८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात विशेष सखोल पुनरीक्षण (एसआरआय) अंतर्गत सर्वसमावेशक प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात ८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघ अंतर्गत विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाशी संबंधित सर्व सहायक मतदार नोंदणी अधिकारी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तसेच पर्यवेक्षक यांचे सविस्तर प्रशिक्षण नुकतेच पार पडले.

सदरील प्रशिक्षण सकाळ व दुपार अशा दोन सत्रांमध्ये आयोजित करण्यात आले होते. सकाळच्या सत्रात सर्व अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले, तर दुपारच्या सत्रात राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, सर्व बीएलओ तसेच रास्त भाव दुकानदार, अंगणवाडी सेविका, पोलीस पाटील, ग्राम रोजगार सेवक इत्यादी घटकांचा सहभाग होता.

या प्रशिक्षणामध्ये विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदारांना गणना फॉर्म वाटप करणे, फॉर्म भरून घेणे, परत संकलित करणे तसेच त्याचे डिजिटायझेशन करणे या प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.





या प्रशिक्षणाचे सविस्तर मार्गदर्शन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नांदेड डॉ. सचिन खल्लाळ तसेच सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार संजय वारकड यांनी केले. प्रशिक्षणाचे नियोजन नितेशकुमार बोलोलु, सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा नायब तहसीलदार (निवडणूक), तहसील कार्यालय नांदेड यांनी केले.

या प्रशिक्षणास सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा उपायुक्त, नांदेड महानगरपालिका नितीन गाढवे, अधीक्षक विष्णू सानप, उपअभियंता शेख महबूब, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, उपअभियंता सूरज स्वामी, उपअभियंता अविनाश शिंगारे, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे, नायब तहसीलदार अशोक मोकळे, सहायक गटविकास अधिकारी श्रीमती सुनीता वानखेडे तसेच निवडणूक शाखेतील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नदीतील पाण्याची पातळी घटली; पाणी जपून वापरा -न.प.माहूर

**माहूर (प्रतिनिधी)–** पैनगंगा नदीतील पाण्याची पातळी घटल्याने माहूर शहराच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मात्र नागरिकांना नियमित पाणीपुरवठा सुरू राहावा यासाठी नगरपंचायत प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याची माहिती नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी दिली.



माहूर शहराची पाणीपुरवठा योजना धानोडा येथील पैनगंगा नदीपात्रावरील जलस्रोतावर अवलंबून आहे. यंदा पावसाने ओढ दिल्याने नदीतील पाण्याची पातळी लक्षणीयरीत्या घटली असून, प्रशासनासमोर पाणीपुरवठ्याचे आव्हान उभे राहिले आहे.

या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी जलसंपदा विभागाचे अधिकारी कंकावार यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. शुक्रवारी रात्री किंवा शनिवारी दिघडी बंधाऱ्यातून पाणी सोडण्यात येणार असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे नदीतील पाण्याची पातळी वाढून शहराचा पाणीपुरवठा पूर्ववत होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी शुक्रवारी शहराच्या पाणीपुरवठा विहिरीची प्रत्यक्ष पाहणी करून यंत्रणेचा आढावा घेतला. यावेळी कार्यालयीन अधीक्षक गजलवाड, विजय शिंदे व शंकर दमलवार उपस्थित होते. पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजनांच्या सूचना यावेळी संबंधितांना देण्यात आल्या.

यावेळी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले. अनावश्यक पाण्याचा अपव्यय टाळून नगरपंचायतीला सहकार्य करावे, असे सांगत प्रशासन शहराचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच नागरिकांनी संयम राखून पाण्याचा जपून वापर करावा, असेही आवाहन केले.

## संस्कार भारतीच्यावतीने भावांजली हा कार्यक्रम उत्साहात

**नांदेड (प्रतिनिधी)–** गेल्या काही महिन्यांत संगीत अवकाशातील आशा भोसले, सुमन कल्याणपूर, चंद्रकांत लिमये आणि प्रसाद सावकार ही स्वरनक्षत्रे निखळली. त्यांना स्वरश्रद्धांजली अर्पण करण्यासाठी संस्कार भारती नांदेडच्या वतीने 'भावांजली' कार्यक्रम उत्साहात पार पडला.



या भावांजली कार्यक्रमात या गायकांनी गायिलेली निवडक भक्तिगीते, भावगीते, नाट्यगीते नांदेड येथील ज्येष्ठ गायक संजय जोशी, सौ. अंजली दीक्षित, कु. चैती दीक्षित या कलावंतांनी सादर केली. संवादिनीवर नव्या पिढीतील उमदा कलावंत श्रीराम जोशी, तबल्यावर ज्येष्ठ तबलावादक डॉ. जगदीश देशमुख, व्हायोलिनची साथ नांदेडचे सुप्रसिद्ध व्हायोलिनवादक पंकज शिरभाते आणि सहवाद्यांची साथ ज्येष्ठ कलावंत भगवानराव देशमुख यांनी केली.

संस्कार भारतीचे अखिल भारतीय संघटन मंत्री आ. अभिजीतदादा गोखले यांच्या विशेष उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमांत आ. दादा गोखले, भगवानराव देशमुख, संस्कार भारती नांदेडच्या अध्यक्षा सौ. राधिकाताई वाळवेकर, जयंत वाकोडकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

शांताबाईंचे शब्द, आशाताईंचा स्वर लाभलेल्या आणि सौ. अंजली व कु. चैती यांनी गायलेल्या 'जय शारदे' या गाण्यांतून रसिक-श्रोत्यांवर स्वरचांदण्यांच्या वर्षावाला आरंभ झाला. अतिशय लडिवाळ, कोमल, मधुर स्वरांत कु. चैती दीक्षित हिने 'ऋतू हिरवा', 'आज कुणीतरी यावे' ही आशाताईंची गाणी सादर केली. सौ. अंजलीताईंच्या अत्यंत सात्त्विक, आर्जवी, आर्त स्वरांतून 'कृष्ण गाथा एक गाणे', 'केतकीच्या बनी', 'जिथे सागरा', 'लिंबलोण उतरू कशी' ही सुमन कल्याणपूर यांच्या गाण्यांनी रसिकमनांचा ठाव घेतला. ज्येष्ठ गायक संजय जोशी यांनी 'सहज सख्या एकटाच'(आशा भोसले) हे गीत व 'कट्यार काळजात घुसली' या संगीत नाटकांतील 'मुरलीधर श्याम' (पं प्रसाद सावकार), 'सूरत पिया की' (पं. चंद्रकांत लिमये) या नाट्यगीतांच्या अतिशय दमदार सादरीकरणाने मैफिलीचा सुरेल कळस गाठला. सर्व गाण्यांना श्रीरामच्या तरल पेटीने, जगदीशजींच्या जबरदस्त तबल्याच्या साथीने, भगवानरावांच्या विविध सहवाद्यांच्या समर्पक साथसंगतीने आणि पंकज शिरभाते यांच्या व्हायोलिनच्या नादमाधुर्याने गाण्यांची लज्जत आणखीनच वाढली.

## गोकुंदा, किनवट येथे राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी

**किनवट (प्रतिनिधी)–** गोकुंदा येथील मराठा सेवा संघ प्रणीत छत्रपती संभाजीराजे विद्यार्थी वसतिगृहात तसेच किनवट शहरातील राष्ट्रवादी पक्ष कार्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष प्रा. दगडू भरकड, तालुका प्रवक्ते प्रा. शिवदास बोकडे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हा सचिव बालाजी पाटील सिरसाट, संजय पवार, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष सचिन कदम, युवासेना तालुकाप्रमुख अतुल दर्शनवाड, सुशील कदम, राजेंद्र जोगदंड, गजानन माने, अवधूत कदम, प्रमोद जाधव, भगवान बामन, शिलवंत येरेकार, विनायक तळेवाड, प्रवीण अंकुशकर ,गौतम मोरे आदी उपस्थित होते.

## राजश्री श्रीरामे पाटील यांची हिंदू महासभा महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुखपदी निवड



**नांदेड (प्रतिनिधी)–** नायगाव तालुक्यातील मुगाव येथील रहिवासी राजश्री श्रीरामे पाटील यांची अखिल भारत हिंदू महासभेच्या महिला आघाडी जिल्हाप्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. निवडीचे पत्र संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष किरण चव्हाण यांनी नुकतेच दिले आहे.

राजश्री पाटील ह्या मागील अनेक वर्षांपासून भारतीय जनता पक्षात कार्यरत होत्या. त्या नायगाव तालुक्याच्या महिला आघाडीच्या सरचिटणीस, त्यानंतर महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्षा म्हणूनही काम केले. सामाजिक व राजकीय क्षेत्रामध्ये त्यांनी केलेल्या कामाची दखल घेत किरण चव्हाण यांनी त्यांची नांदेड जिल्हा प्रमुखपदी (महिला) नियुक्ती केली आहे. त्यांनी संघटनेसाठी सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन संघटना वाढीचे काम करावे, असे किरण चव्हाण यांनी नियुक्ती पत्रात उल्लेख केला आहे.

## 'पोलिओमुक्त भारतासाठी सज्ज व्हा'; भोकरमध्ये जनजागृती रॅलीने वेधले लक्ष



**भोकर (प्रतिनिधी)–** 'दोन थेंब बालकासाठी, पोलिओवर विजय निश्चित' या ध्येयवाक्याचा नारा देत भोकर शहरात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या जनजागृतीसाठी शनिवारी शहरात जनजागृती रॅली काढून मोहिमेचा एल्गार पुकारण्यात आला.

ग्रामीण रुग्णालय भोकरच्या वतीने आयोजित या मोहिमेत शून्य ते पाच वयोगटातील बालकांना पोलिओ लस दिली जाणार आहे. भोकर शहरात २१ लसीकरण बुथ, ३ ट्रांझिट टीम आणि १ मोबाईल टीम सज्ज करण्यात आली आहे. रॅली ग्रामीण रुग्णालय येथून सुरू होऊन विमल इंग्लिश स्कूल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे तहसील कार्यालयापर्यंत काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी फलक आणि घोषणांद्वारे नागरिकांमध्ये लसीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, अति. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनुपमा शिंदे आणि निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविली जात आहे. लसीकरण मोहिमेच्या उद्घाटन प्रसंगी नगराध्यक्ष भगवान दंडवे, आरोग्य सभापती तथा डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. फेरोज इनामदार आणि डॉ. राम नाईक यांनी पालकांना त्यांच्या पाल्यांना आवर्जून पोलिओ डोस पाजवावे, असे आवाहन केले आहे.

ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रताप चव्हाण, आरोग्य निरीक्षक सत्यजीत टिप्रेसवार आणि सिस्टर उज्ज्वला पवार यांनी मोहिमेचे नियोजन केले. या उपक्रमात विमल इंग्लिश स्कूलचे संचालक लक्ष्मण नाईक जाधव, डॉ. रंजू नाईक जाधव, मुख्याध्यापक सादिक शेख, शिक्षकवृंद, जिल्हा परिषद नूतन शाळेचे शिक्षक तसेच ग्रामीण रुग्णालयातील मनोज पांचाळ, नामदेव कंधारे, योगेश पवार, सुरेश डुम्मलवाड, सरस्वती दिवटे, मुक्ता गुट्टे, संगीता पंदीलवाड यांच्यासह आरोग्य कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




**नांदेड–** भोई समाज महासंघाच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा कुसुम सभागृह येथे नुकताच पार पडला. यावेळी प्रा. डॉ. मिलिंद भोई, डॉ. अनिल गुंजाळ, प्रा. अर्चिता मडके, प्रा. महेंद्र खेडकर, गोपाळराव धारपवार, डॉ. अर्जुन भोई यांनी मार्गदर्शन करून गुणवंतांचा सत्कार केला. यावेळी आयोजक राजू मामूलवार, यादवराव पदीलवाढ, जगदीश कोटगीरे, राजू वालगोटेवाड, श्रीराम टोपलवाड, नामदेव पंदेवाड, लहू पदीलवाड, बालाजी अडगुलवाड, संतोष निलावार, सुनील निलेवार, अंकुश राजेंद्र मामुलवार, मनोज कोमटवार आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

## विश्वास, विकास आणि शेतकरी सक्षमीकरणाचा उत्सव; श्री सुभाष पत संस्थेचा प्रथम वर्धापन दिन साजरा

**हदगाव (प्रतिनिधी)–** शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत अल्पावधीतच ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करणाऱ्या श्री सुभाष रुरल को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या प्रथम वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



तसेच श्री सुभाष शुगर प्रा. लि., हडसणी व शिऊर साखर कारखाना लि., वाकोडीचे चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त हदगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

मागील वर्षी कार्यकारी संचालक सुशीलकुमार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन स्थापन झालेल्या या पतसंस्थेने अत्यंत कमी कालावधीत शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. शेतकऱ्यांना सुलभ आर्थिक सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुरू झालेल्या या संस्थेच्या यशस्वी वाटचालीचा प्रथम वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दत्ता देशमुख होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून यशवंतराव देशमुख कल्याणकर, जनरल मॅनेजर राजेश मानधना, मधुकर पतंगे, मुख्य शेतकी अधिकारी किशोर वानखेडे, संजय कदम, प्रल्हाद पाटील हडसणीकर, दत्ता सुकळकर, बालाजी नरवाडे तसेच संस्थेचे अधिकारी, कर्मचारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी सुभाषराव देशमुख यांना वाढदिवसा-निमित्त शुभेच्छा देत त्यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी हितासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. कार्यक्रमादरम्यान वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला.

पतसंस्थेच्या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांना गती मिळाली असून, भविष्यातही शेतकरी कल्याणासाठी नाविन्यपूर्ण योजना व लोकाभिमुख उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# नांदेडमध्ये पल्स पोलिओ मोहिमेचा शुभारंभ

## ३ लाख ८८ हजार बालकांना संरक्षणात्मक डोस देण्याचे उद्दिष्ट

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेची नुकतीच नांदेड जिल्ह्यात सुरुवात करण्यात आली. नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील तिडके बोंढारकर यांच्या हस्ते मोहिमेचा शुभारंभ झाला. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके आणि अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनुपमा शिंदे उपस्थित होत्या.



या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील एकूण ३ लाख ८८ हजार ५१६ बालकांपर्यंत पोहोचून त्यांना पोलिओचे संरक्षणात्मक डोस देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रशासनाने व्यापक नियोजन केले आहे. मागील मोहिमेतील कामगिरीचा विचार करून लाभार्थी बालकांची संख्या निश्चित करण्यात आली असून, जिल्हाभरात २ हजार ८३६ पोलिओ बुथ उभारण्यात आले आहेत. प्रत्येक बुथवर आवश्यक मनुष्यबळ व पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

बुथवर येऊ न शकणाऱ्या बालकांसाठी घरोघरी भेट देणारी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. ही पथके निश्चित कालावधीत घरांपर्यंत पोहोचून लसीकरण पूर्ण करतील.

याशिवाय, रेल्वे स्थानक, बसस्थानके आणि तपासणी नाक्यांवर ट्रान्झिट टीम्स कार्यरत राहतील. भटक्या आणि बेघर कुटुंबातील मुलांपर्यंत पोहोचण्यासाठी मोबाईल टीम्स तसेच नाईट टीम्स देखील तैनात करण्यात आल्या आहेत.

लसीकरणासाठी सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ग्रामीण रुग्णालये सक्रिय करण्यात आली असून, वैद्यकीय अधिकारी आणि जिल्हास्तरीय पर्यवेक्षकांकडून संपूर्ण मोहिमेवर देखरेख ठेवली जाणार आहे. लसीची गुणवत्ता अबाधित राहण्यासाठी कोल्ड चेन इक्विपमेंट, व्हॅक्सीन करिअर, कोल्ड बॉक्स आणि आयस पॅक यांची आवश्यक तयारी करण्यात आली आहे.

जिल्हा आरोग्य प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, एकही बालक सुटणार नाही, पोलिओ पुन्हा उद्भवणार नाही, या संदेशानुसार आपल्या परिसरातील ० ते ५ वर्षांखालील सर्व बालकांना जवळच्या पल्स पोलिओ बुथवर नेऊन पोलिओचे 'दोन थेंब' पाजावेत आणि राष्ट्रीय मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन केले.

# शिवार

# लागवड तयारी फळबागेची !

**ज्या फळझाडांची लागवड करायची आहे, त्याच्या गरजेनुसार आपल्याकडील उपलब्ध जागेपैकी योग्य क्षेत्राची निवड करावी. जागेची निवड झाल्यावर लागवडीच्या पद्धतीप्रमाणे फळबागेची आखणी करणे गरजेचे आहे. फळपिके लागवडीच्या चौरस, षटकोनी व उतार अशा निरनिराळ्या पद्धती आहेत.**



प्रत्येक पद्धतीने १ हेक्टर क्षेत्रातील झाडांची संख्या वेगवेगळी येईल. बहुतेक ठिकाणी फळबागा चौरस पद्धतीने लावतात. या पद्धतीत दोन ओळींतील आणि दोन झाडांमधील अंतर सारखेच असून, ओळी काटकोनात असतात. मशागतीच्या प्रत्येक फळझाडाचा विस्तार आणि मुळ्यांची वाढ यांचा विचार करून दोन झाडांमध्ये योग्य अंतर ठेवले पाहिजे. प्रत्येक झाडांची योग्य वाढ होऊन फळधारणेसाठी आवश्यक तेवढा सूर्यप्रकाश आणि हवा मिळेल. आखणीच्या दृष्टीने सोपी व सोईस्कर पद्धत ही चौरस पद्धत असली तरी यामध्ये सुरुवातीच्या काळात बरीचशी जागा निरुपयोगी राहते म्हणून काही ठिकाणी त्रिकोणी किंवा षटकोनी पद्धतीचा वापर करतात. या पद्धतीत दोन झाडांमधील अंतर सर्व बाजूंनी सारखे राहते, त्यामुळे हेक्टरी १५ टक्के झाडे अधिक बसून उत्पादनही अधिक मिळू शकते. विविध झाडांसाठी शिफारस केलेले अंतर, खड्ड्यांचा आकार व हेक्टरी बसणारी झाडे याचा विचार करावा. अंतराच्या या शिफारशी अनेक प्रयोगानंतर ठरविलेल्या असतात. त्यापेक्षा वेगळ्या प्रमाणात फळझाडांची लागवड केल्यास वाढ आणि उत्पादनावरही अनिष्ट परिणाम होतो. सघन पद्धतीमध्ये लागवड करणार असाल, त्याच्याही शिफारशी आहेत. याचे उत्पादन वाढते हे खरे असले तीर पुढे काही काळानंतर झाडांची छाटणी व अन्य खर्चामध्ये वाढ होते. डोंगर उतारावरील जमिनीवर लागवड करणार असल्यास उताराला आडवे चर खोदून त्यावर लागवड करावी. यालाच 'कंटूर लागवड' म्हणतात.

## फळबागेसाठी खड्डे भरणे..

शिफारशीप्रमाणे योग्य अंतरावर आखणी केलेल्या जागांवर खड्डे खोदायचे असतात. योग्य लांबी, रुंदीचे व खोलीचे खड्डे काढावेत. खड्डा खोदताना वरच्या व खालच्या थरातील माती वेगवेगळी टाकावी. खड्डे किमान दोन ते तीन आठवडे तापू द्यावेत. प्रखर सूर्यप्रकाशामुळे खड्ड्यांचे निर्जंतुकीकरण होईल. मेच्या दुसऱ्या पंधरवड्यात किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यात खड्डे परत भरावे. खड्डे मातीने भरताना ते निर्जंतुकीकरण करून वाळलेला पालापाचोळा १५ सें.मी. थरात भरावा. पोयटा माती, मातीमध्ये २०-२५ किलो चांगले कुजलेले शेणखत अधिक १ ते १.५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट अधिक २ ते ३ किलो गांडूळखत अधिक २ ते ३ किलो लिंबोळी पेंड अधिक २५ ग्रॅम ट्रायकोडर्मा जिवाणू अधिक १५ ग्रॅम स्फुरद विरघळवणारे जिवाणू अधिक २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर अधिक दाणेदार कीडनाशक शिफारशीप्रमाणे घेऊन मिश्रण तयार करावे. या मिश्रणाने खड्डा जमिनीच्या वर ५ ते ७ सें.मी उंच भरून ठेवावा. खड्ड्याच्या मध्यभागी लाकडी खुंट रोवावा. पावसाळ्याच्या सुरुवातीस त्या खुंटाच्या जागेवर निवडलेल्या फळाचे कलम किंवा रोप लागता येईल.



## फळझाड लागवडीचे अंतर व त्यानुसार बसणारी झाडे

| फळझाडाचे नाव | लागवडीचे अंतर | हेक्टरी झाडे | एकरी झाडे |
|---|---|---|---|
| आंबा | १० × १० मीटर | १०० | ४० |
| आंबा (सघन) | ५× ५ मीटर | ४०० | १६० |
| चिकू | १० × १० मीटर | १०० | ४० |
| सीताफळ | ५ × ५ मीटर | ४०० | १६० |
| पेरू | ६ × ६ मीटर | २७७ | १११ |
| मोसंबी | ६ × ६ मीटर | २७७ | १११ |
| कागदी लिंबू | ६ × ६ मीटर | २७७ | १११ |
| संत्रा | ६ × ६ मीटर | २७७ | १११ |
| आवळा | ७× ७ मीटर | २०४ | ८२ |
| अंजीर | ४.५ × ३.० मीटर | ७४० | २९६ |
| चिंच | १० × १० मीटर | १०० | ४० |
| जांभूळ | १० × १० मीटर | १०० | ४० |

## फळझाडासाठी खड्ड्यांचा आकार

| फळझाडाचे नाव | खड्ड्याचा आकार |
|---|---|
| आंबा, संत्रा, मोसंबी, फणस, चिकू, पेरू, नारळ व सुपारी | ९० सें. मी. × ९० सें. मी. × ९० सें. मी. |
| कागदी लिंबू | ७५ × ७५ × ७५ सें. मी. |
| डाळिंब, काजू, बोर व अंजीर | ६० × ६० × ६० सें. मी. |
| केळी, आवळा, सीताफळ व पपई | ४५ × ४५ × ४५ सें. मी. |
| द्राक्ष | ६० सें. मी. खोल आणि ६० सें. मी. रुंद सलग चर |
| अननस | ९० सें. मी. रुंद आणि २२ ते ३० सें. मी. खोल सलग चर |





# पावसाळ्यात द्राक्ष बागेचे व्यवस्थापन !

**द्राक्ष विभागात सद्यःस्थितीचा विचार करता सर्वत्र थोडाफार व काही ठिकाणी भरपूर पाऊस झाल्याचे चित्र आहे. बहुतांश सर्व ठिकाणी ढगाळ वातावरण आणि झालेल्या पावसामुळे वाढलेली आर्द्रता या गोष्टी वेलीच्या शाकीय वाढीला पोषक आहेत. या वेळी वातावरणातील तापमान (३५ अंशापर्यंत) कमी झाले व आर्द्रता जास्त (७० टक्क्यांपुढे) प्रमाणात वाढली. यामुळे द्राक्षबागेत वेगवेगळ्या स्थितीमध्ये असलेली द्राक्ष वेलींवर होणारे परिणाम व समस्या जाणून त्यावरील संभाव्य उपाययोजनांची माहिती घेऊ...**

## नवीन फुटी जास्त प्रमाणात निघणे...

- खरडछाटणी लवकर झालेल्या द्राक्ष बागेत पाऊस सुरू होईपर्यंत काडी अर्ध्यांपर्यंत परिपक्व होणे गरजेचे असते. काडी अर्ध्यापर्यंत परिपक्व झालेल्या स्थितीत फुटीचा शेंडा जास्त प्रमाणात वाढत नाही. या वेळी बागेत पालाशची उपलब्धता सुरू असल्यामुळेही शेंडा वाढ नियंत्रणात असते. वाढत्या आर्द्रतेमुळे शेंडा थोडाफार वाढला तरी या वेळी शेंडा पिंचिंग करून वाढ नियंत्रणात ठेवता येते.
- उशिरा छाटणी झालेल्या बागेत मात्र परिस्थिती वेगळी असेल. येथे काडी कच्ची असून, आताही ती तळातून गुलाबी रंगाची असेल. अशा परिस्थितीत शेंडा वाढ जोमात होईल. कारण या वेलीवर शाकीय वाढीची अवस्था अजूनही पूर्णपणे संपलेली नाही. फक्त या काड्यांवर बगलफुटीही जास्त जोमात निघत असतील. या वेलीचा आता सूक्ष्मघड निर्मितीचा कालावधी असू शकतो. बागेत व्यवस्थित सूक्ष्मघड निर्मिती होण्याच्या दृष्टीने काडीच्या प्रत्येक डोळ्यावर सूर्यप्रकाश पडणे गरजेचे असेल. परंतु, या बागेत फुटी जास्त वाढल्यामुळे कॅनोपीमध्ये गर्दी होईल. डोळ्यावर आवश्यक तो सूर्यप्रकाश मिळणार नाही. अशा बागेत बगलफुटी काढणे, शेंडा पिंचिंग करणे, संजीवकांचा वापर (६ बीए आणि युरासिल) आणि स्फुरद व पालाशयुक्त खते यांचा वापर या उपाययोजनांवर भर द्यावा लागेल. सध्या बागेत पावसाळी दिवस असल्यामुळे आर्द्रता कमी होण्याची शक्यता नाही. त्यामुळे गरज असलेल्या काळातच फक्त पाण्याची उपलब्धता करावी, अन्यथा बागेत या वेळी पाण्याची गरज नसेल.
- ज्या बागेत खरडछाटणी उशिरा झाली आणि आता काडी तळातून दुधाळ रंगाची (म्हणजे अर्ध परिपक्व) झाली असल्यास शेंड्याकडील फूट जास्त प्रमाणात वाढताना दिसणार नाही. या वेळी बागेत संजीवकांची गरज नसेल. त्याऐवजी शेंडा पिंचिंग करून काडी तारेवर बांधावी. यामुळे हवा खेळती राहील व उपलब्ध सूर्यप्रकाशाचा फायदा घेता येईल. या परिस्थितीतील बागेत पाण्यावर नियंत्रण ठेवणे व पालाशयुक्त खतांचा वापर जमिनीतून व फवारणीद्वारे करणे फायद्याचे राहील. वाढ आणि रोग नियंत्रणाचा विचार करता या बागेत बोर्डो मिश्रणाची अर्धा टक्के या प्रमाणे फवारणी करता येईल. काडीची परिपक्वता पाहून पुढील दहा दिवसाने पुन्हा ०.७५ ते १ टक्के या प्रमाणात बोर्डो मिश्रणाची फवारणी केल्यास वाढ व रोग नियंत्रणात राहील.
- काही बागेत सबकेनकरिता शेंडा पिचिंग केल्यानंतर निघालेली फूट एकदम अशक्त होती आणि काडीही बारीक राहिली असल्याचे शेतकऱ्यांकडून समजले. या बारीक काडीवर सूक्ष्मघड निर्मिती होईल की नाही, तसेच काडीची जाडीसुद्धा कमी असल्यामुळे घडाचे वजन आवश्यक तितके मिळणार नाही असा संभ्रम शेतकऱ्यांमध्ये दिसत आहे. सबकेननंतर शेंडा न वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे बागेत त्या वेळी पाणी एकतर कमी दिले असेल किंवा पाण्याचा ताण बसला असेल. बागेत सध्या मात्र पाऊस, कमी तापमान व वाढलेल्या आर्द्रतेमुळे वाढीसाठी अत्यंत पोषक वातावरण आहे. या वेळी शेंडा वाढ दिसून येईल. काडी जर तळातून गुलाबी ते दुधाळ रंगाची असल्यास शेंडा वाढ चांगल्या तऱ्हेने मिळेल. उपलब्ध पानांच्या संख्येनुसार काडीची जाडी वाढण्यास मदत होईल. त्यामुळे जाड काडीवर सहजरित्या चांगल्या वजनाचा घड मिळू शकेल. याकरिता शेंडा थांबलेल्या परिस्थितीत फुटींवर दोन ते तीन पाने खुडून घ्यावीत. म्हणजे नवीन बगलफुटी सहज निघतील. त्यातून पानांची संख्या पूर्ण करून घेता येईल. काडी तळातून सबकेनपर्यंत परिपक्व झालेल्या परिस्थितीत मात्र काडीची जाडी वाढणे शक्य नसते. या वेळी शेंडा वाढ करून पुढील काडी वाढवून अन्नद्रव्याचा साठा वाढवून घेता येईल.

## उपाययोजना...

- बागेत पाणी वाढवावे.
- शेंडा खुडणे बंद करून निघालेल्या बगलफुटी नवीन तीन ते चार पाने येईपर्यंत वाढू द्याव्यात.
- पालाश व संजीवकांचा वापर टाळावा. यामुळे शाकीय वाढ सुरू राहून नवीन गाठ तयार होणार नाहीत.
- जमिनीवर तणनाशकाची फवारणी करायचीच असेल, तर शक्यतो काडी परिपक्वतेच्या शेवटच्या टप्प्यात केलेली फायदेशीर ठरेल.

## काडीवर गाठी येण्याची समस्या

बऱ्याचशा बागेत ओलांड्याचा पहिला टप्पा झाल्यानंतर दुसरा टप्पा तयार करण्याकरिता नत्रयुक्त खते, संजीवके (विशेषतः सायटोकायनीनयुक्त ६ बीए आणि युरासील), उपलब्ध टॉनिक यांचा वापर जास्त प्रमाणात केला जातो. या वेळी एकतर तापमान जास्त असल्यामुळे वाढ होण्याकरिता आवश्यक तितके पाणीसुद्धा मिळत नाही. त्यामुळे वाढ खुंटलेली दिसते. वाढ नियंत्रणात असलेल्या द्राक्षवेलीमध्ये सायटोकायनीनचे प्रमाण वाढून जिबरेलीनचे प्रमाण कमी होत असल्याचे आपण या पूर्वीही सांगितले आहे. म्हणजेच वेलीमध्ये आधीच सायटोकायनीन वाढलेले आहे, आणि त्यावर पुन्हा सायटोकायनीनयुक्त संजीवके व टॉनिक यांची फवारण्या झाल्यामुळे वेलीमध्ये सायटोकायनीनचे प्रमाण आणखी जास्त वाढते. पुढील शेंड्याकडील वाढ थांबल्यामुळे वेलीवर एक प्रकारचा दाब निर्माण होतो. त्यामुळेच काडीवर गाठी आलेल्या दिसतील. काडी काही ठिकाणी फुगलेली दिसते. फुगलेल्या भागात चिरे पडलेले दिसून येतील. काही स्थितीमध्ये त्या काडीवर मुळ्याही निघत असल्याचे दिसते. अशा जास्त परिणाम झालेल्या बागेत काडी त्याच ठिकाणी वाकेल किंवा मोडेल. अशा काड्यामध्ये पोकळीही निर्माण होते. त्यामुळे अन्नद्रव्याचा पुरवठा शेंड्याकडे होत नाही. काडी अशक्त राहून त्यामध्ये घड येणार नाही किंवा घडाचा विकास होणे शक्य नसते. काडी परिपक्व होण्यापूर्वीच्या कालावधीत बऱ्याच बागेत जमिनीवर तणनाशक वापरले जाते. वेलीला वळण व्यवस्थित दिलेले असल्यास सर्व फुटी तारेवर असतील. अन्यथा खाली वाकलेल्या फुटींने तणनाशक शोषून घेतले तरी त्याचे परिणाम पुढील हंगामात छाटणीनंतर दिसून येतील.

# फळबाग : पावसाळ्यात खत व्यवस्थापन

**आंबा व पेरू अशा बहुवार्षिक फळपिकांमध्ये दरवर्षी दर्जेदार आणि भरपूर उत्पादन मिळण्यासाठी अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन अत्यंत काटेकोरपणे करणे आवश्यक असते. खत व्यवस्थापनाच्या शिफारशी आणि द्यावयाची वेळ यांची माहिती घेऊ...**

- आंबा : आंबा फळपिकांसाठी भारी प्रतीची, १.५-२ मीटर खोलीची जमीन उपयुक्त ठरते. त्याची मुळे खोलवर जाऊन जमिनीमधील वेगवेगळ्या स्तरांतून अन्नद्रव्ये घेत असतात. त्यासाठी जमिनीमध्ये मुबलक (आवश्यक) प्रमाणामध्ये अन्नद्रव्ये असल्यास उत्पादनाच्या दृष्टीने फायद्याचे ठरते. आंबा फळझाडामध्ये फुलोरावस्था, फळधारणा, फळविकास व फळांची काढणी या साधारणतः ९०-१०० दिवसांमध्ये अन्नद्रव्यांची गरज पूर्ण व्हावी लागते. त्यासाठी पूर्ण वाढ झालेल्या झाडांना पावसाळ्यात साधारणतः जुलै महिन्यात प्रतिवर्षी ५० किलो शेणखत द्यावे. त्यासोबत ७५० ग्रॅम नत्र (१६३० ग्रॅम युरिया), ५०० ग्रॅम स्फुरद (१०८६ ग्रॅम डी.ए.पी.) व ५०० ग्रॅम पालाश (८३३ ग्रॅम एम.ओ.पी.) द्यावे. नत्र खताचा पुढील हप्ता ७५० ग्रॅम नत्र (१६३० ग्रॅम युरिया) सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात द्यावा.
- खत देण्याची पद्धत : खतांची मात्रा देताना झाडाच्या मुख्य खोडाभोवती ३० सें.मी. अंतरावर गोलाकार १५-२० सें.मी. खोलीपर्यंत छोटा चर खोदून घ्यावा. त्यात बांगडी पद्धतीने खताची मात्रा द्यावी. त्यावर त्वरित १-२ सें.मी. मातीचा थर टाकून हलक्या स्वरूपाचे पाणी द्यावे. त्यामुळे अन्नद्रव्यांचे बाष्पीभवन किंवा निचरा स्वरूपातून ऱ्हास होणार नाही.



### पेरू

पेरू फळपीक बहुवार्षिक असून, त्याला वर्षभर फुले येत असतात. परंतु, फळांच्या योग्य आकारासाठी, गुणवत्तेसाठी बहर धरणे आवश्यक असते. अशा प्रकारे एकाच वेळी फळे काढणीला आल्याने त्याचे नियोजन सोपे होते. पेरूची अभिवृद्धी बियांपासून केलेल्या रोपांची लागवड केल्यास उत्तम दर्जाची फळे मिळण्यासाठी साधारणतः ४-५ वर्षे लागतात. मात्र, शाखीय पद्धतीने, कलमांपासून तयार केलेल्या रोपांची लागवड केल्यास २ ते ३ वर्षांतच फळधारणा होते. पेरूमध्ये फळे येण्यासाठी एकच बहर धरणे गरजेचे असते, त्यासाठी पाण्याचे व खताचे व्यवस्थापन योग्य रीतीने करावे. पूर्ण वाढ झालेल्या पेरूच्या प्रतिझाडासाठी २०-२५ किलो शेणखत, ४५० ग्रॅम नत्र (९७८ ग्रॅम युरिया), ३०० ग्रॅम स्फुरद (६५२ ग्रॅम डी.ए.पी.) आणि ६०० ग्रॅम पालाश (५०० ग्रॅम एम.ओ.पी.) बहराच्या वेळी म्हणजे मृग नक्षत्रात (पावसाळ्यात) द्यावे. तसेच, ४५० ग्रॅम नत्र (१७८ ग्रॅम युरिया) प्रतिझाडास फळधारणेनंतर दुसऱ्या हप्त्यात द्यावा. खतांची मात्रा देताना मुख्य खोडाभोवती ३० सें.मी. त्रिज्येच्या अंतरावर १५-२० सें. मी. खोलीवर बांगडी पद्धतीने माती खोदावी. त्यात खतांची मात्रा देऊन खत २-३ सें.मी. मातीच्या साह्याने मातीआड करावे. खताची मात्रा दिल्यानंतर त्वरित हलक्या स्वरूपात पाणी द्यावे. दर्जेदार पेरू उत्पादनासाठी विद्राव्य खतांची फवारणीही फायदेशीर ठरते. पेरूसाठी १% युरियाची फवारणी केल्यास किफायतशीर ठरते. (१० ग्रॅम युरिया प्रतिलिटर पाणी) - वर्षातून २ वेळा - पहिली फवारणी मार्च महिन्यात, तर दुसरी फवारणी ऑक्टोबर महिन्यात केल्यास उत्पादनामध्ये वाढ होते. यासोबत माती परीक्षणामध्ये कमतरता आढळल्यास ०.५% झिंक (जस्त) फवारणी करावी. (५ ग्रॅम झिंक सल्फेट प्रतिलिटर पाणी) पेरू झाडामध्ये वेगवेगळ्या सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरतेची लक्षणे दिसतात. त्यावर लक्ष ठेवून खतांचे नियोजन करावे. साधारणतः नवीन पालवी येणे, फुले येण्याची वेळ, तसेच फळधारणा या वेळी प्रतिलिटर पाण्यामध्ये प्रत्येकी ५ ग्रॅम प्रमाणात झिंक सल्फेट, मॅग्नेशियम सल्फेट, मॅंगेनिज सल्फेट किंवा कॉपर सल्फेट यांची आवश्यकतेनुसार फवारणी करावी.

# पावसाळ्यात जनावरांना आजार होऊ नये म्हणून...

पावसाळ्यात नवीन उगवलेलं गवत जनावरांनी जास्त प्रमाणात खाल्ल्याने जनावरांना पोटफुगीचा (bloat) त्रास होतो. पोटफुगीच्या एका प्रकारात पोटात मोकळी हवा साचून राहते. दुसऱ्या प्रकारात हवेबरोबर पाणी पण साचून राहते. कोवळे लुसलुशीत गवत जास्त प्रमाणात खाल्ल्याने जनावरांना नायट्रेट विषबाधा होण्याचीही शक्यता असते. विषबाधेची तीव्रता जास्त असल्यास जनावराला चक्कर येऊन ते खाली पडते. पावसाळ्यात जनावरांना डायरिया, जंत प्रादुर्भाव होण्याचीही शक्यता असते. पावसाळ्यात सततच्या ओलसर वातावरणामुळे जनावरांमध्ये कासेचे आजार दिसून येतात. धार काढल्यानंतर सडाचे छिद्र जवळपास ४५ मिनिटे बंद होत नाही. ओलसर ठिकाणी जनावर बसल्यास दगडीचे जीवाणू या उघड्या छिद्रातून कासेत प्रवेश करतात. दगडीमध्ये जनावरांच्या कासेतून लालसर रंगाचे दूध बाहेर येते. स्ट्रेप्टोकोकस जीवाणूमुळे संसर्ग झाला असल्यास, कासेच्या खालील बाजूस सूज येते. सडाभोवती माशा बसलेल्या दिसतात. ई. कोलाय जीवाणूंचा प्रादुर्भाव झालेला असल्यास जनावरांना खूप जास्त ताप येतो. पावसाळ्यात जनावरांचे पाय सतत चिखलात किंवा ओलसर राहिल्याने खुरे नरम पडत असतात. नरम पडलेल्या खुरांना जखम फार लवकर होते. परिणामी जनावरांना खुरांचा संसर्ग झालेला दिसून येतो. खुरांना जखम झाल्याने जनावर लंगडायला लागते. पावसाळ्यातील वातावरण दमट असल्याने गोचीडांची संख्याही मोठ्या प्रमाणावर वाढत असते. गोचीडमुळे जनावरांना थायलेरीया, बबेशिया, अनाप्लाझ्मा यांसारख्या आजारांची बाधा होत असते.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## निवासी शाळा व वसतिगृहाच्या प्रस्तावाला मंजुरी देण्याची आ. श्रीजया चव्हाण यांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** भोकर विधानसभा मतदारसंघातील भोकर व मुदखेड येथे सामाजिक न्याय विभागांतर्गत निवासी शाळा आणि वसतिगृह उभारण्याच्या मागणीसाठी आमदार श्रीजया चव्हाण यांनी विधानसभेत औचित्याचा मुद्दा मांडला. या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांच्या या महत्त्वाच्या प्रश्नाकडे राज्य सरकारचे लक्ष वेधले.



विधानसभेत आपली मागणी मांडताना आमदार श्रीजया चव्हाण म्हणाल्या की, भोकर आणि मुदखेड येथे निवासी शाळा तसेच वसतिगृह बांधण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे दोन वर्षांपूर्वीच सादर करण्यात आला आहे. मतदारसंघातील ग्रामीण भागातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची निवासासह शिक्षणाची सोय व्हावी, यासाठी भोकर येथे निवासी शाळा आणि मुदखेड येथे आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलांसाठी वसतिगृह उभारणे अत्यंत आवश्यक आहे.

सध्या या सुविधांअभावी मागासवर्गीय तसेच आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांची गैरसोय होत असून, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये अडचणी निर्माण होत आहेत. ही बाब स्थानिक विद्यार्थ्यांच्या आणि व्यापक सार्वजनिक हिताची असल्याने शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे आणि या प्रलंबित प्रस्तावाला लवकरात लवकर मंजुरी द्यावी, अशी मागणी आमदार श्रीजया चव्हाण यांनी यावेळी केली.

# पोलिसांचे कोंबिंग ऑपरेशन; १६ गुन्हेगार अटकेत

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या शांततेला गालबोट लागू नये, नांदेडकरांना आपले शहर हे सुरक्षित वाटावे यासाठी नूतन पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी कोंबिंग ऑपरेशन राबवून शहराच्या वेगवेगळ्या ठाण्यांतर्गत १६ जणांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी अनेकांची तपासणी करण्यात आली.



अवैध शस्त्र बाळगणे, हद्दपार, तडीपार, हिस्टरी सीटर, सराईत गुन्हेगार आणि यासोबतच पाहिजे आणि फरारी गुन्हेगारांना पकडण्यासाठी व त्यांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी २८ जूनच्या रात्री अकरापासून ते २९ जूनच्या पहाटे तीन वाजेपर्यंत पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशन करून आरोपींची धरपकड केली.

या कोंबिंग ऑपरेशनमध्ये ५५, ५६, ५७ कलमानुसार तडीपार झालेल्या २७, एमपीडीए अंतर्गत सुटलेले २९, माला विरुद्ध आणि शरीराविरुद्ध गुन्हे असलेल्या ५७, आर्म अॅक्ट अंतर्गत तीन, पाहिजे फरारी असलेल्या चार, कलम २२ अंतर्गत १३, जामीनपात्र १८, अजामीनपात्र १२ आणि चार जणांना समन्स बजावण्यात आले.

या दरम्यान विमानतळ ठाण्यात १, नांदेड ग्रामीणमध्ये ६, शिवाजीनगर २, भाग्यनगर २, इतवारा ३ आणि वजिराबाद २ अशा १६ जणांना अटक करून त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. यापुढेही शहरात कायदा व सुव्यवस्था बाधित करणाऱ्यांना त्यांची जागा दाखविल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असा इशारा पोलीस अधीक्षक निलाभ रोहन यांनी 'गोदातीर समाचार'शी बोलताना दिला आहे.

## नायगावात घरफोडी; ९ लाख ७० हजारांची रोकड लंपास

**नांदेड (प्रतिनिधी)–** नायगाव शहरातील व्यंकटेशनगर परिसरात पुन्हा एकदा धाडसी घरफोडीची घटना घडली असून, चोरट्यांनी घरातून सुमारे ९ लाख ७० हजार रुपयांची रोकड लंपास केले आहेत. या घटनेमुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

नायगाव पंचायत समितीमध्ये कनिष्ठ सहायक म्हणून कार्यरत असलेले माधव कोटकर हे देवदर्शनासाठी बाहेरगावी गेले होते. रविवार, दि. २८ जूनच्या रात्री उशिरा घरी परतल्यानंतर घरफोडी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. कपाटातील ९ लाख ७० हजार रुपयांची रोख रक्कम चोरट्यांनी चोरून नेली आहे. कोटकर यांनी सदरील रक्कम प्लॉट घेण्यासाठी एकत्रीत जमा केली होती. सदरील रक्कम घरात ठेवून ते देवदर्शनासाठी कुटुंबियांसमवेत गेले होते. चोरीच्या घटनेची माहिती त्यांनी तत्काळ नायगाव पोलीस ठाण्यात दिली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. तसेच २९ जून रोजी श्वानपथकाचीही मदत घेण्यात आली असून, आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

दरम्यान, नायगाव शहर व परिसरात सातत्याने घरफोडीच्या घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वारंवार होणाऱ्या घरफोड्यांतील अनेक गुन्ह्यांचा अद्याप उलगडा झालेला नाही.



**नांदेड –** नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीसाठी कंधार मतदारसंघातून माजी जि. प. सदस्या प्रणिताताई देवरे-चिखलीकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तसेच लोहा मतदारसंघातून माजी सभापती आनंद पाटील शिंदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे मा. संचालक प्रवीण पाटील चिखलीकर, माजी जि. प. सभापती शिवराज पाटील होटाळकर, माजी जि. प. सदस्य बाबुराव पाटील गिरे, सचिन पाटील चिखलीकर, स्वप्नील लुंगारे, अनिल पाटील बोरगावकर आदी दिसत आहेत. **(छाया : करणसिंह बैस, नांदेड)**

## खरीप हंगाम २०२५ जिल्हास्तरीय पीकस्पर्धेचा निकाल जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–**राज्यात खरीप हंगाम सन २०२५ मध्ये भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग व सूर्यफूल या पिकांसाठी पीकस्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार खरीप हंगाम सन २०२५ जिल्हास्तरावर पीकस्पर्धा निकाल जाहीर झाला. यामध्ये सोयाबीन पिकात शेख अजीम शेख खाजा मोईनोद्दीन, (उत्पादन ४०.२४ क्विं./ हे.) रा.निचपूर ता. किनवट, पिराजी बाबाराव अरसुळे, (उत्पादन ३४.३३ क्विं./हे.) रा. एकदरा, ता. नांदेड, ज्ञानेश्वर पुरभाजी आढाव, (उत्पादन ३३.३३ क्विं./हे.) हदीदापूर ता. नांदेड हे शेतकरी सर्वसाधारण गटामध्ये सोयाबीन या पिकामध्ये क्रमशः प्रथम, द्वितीय व तृतीय आले आहेत.

तसेच युवराज प्रकाश तोडसाम (उत्पादन २४.०० क्विं./हे.) रा. गोंडवडसा ता. माहुर हे आदिवासी गटामध्ये सोयाबीन या पिकामध्ये प्रथम आले आहेत. मूग पिकामध्ये गोविंद मारोती होळगे (उत्पादन १०.५० क्विं./हे.) व उडीद पिकामध्ये विश्वनाथ गोविंदराव होळगे (उत्पादन ७.०० क्विं./हे.) रा. दापसेड ता. लोहा हे प्रथम आले आहेत. भोकर तालुक्यातून मका या पिकामध्ये अनुक्रमे बाबय्या संतोबा कोरडेवाड (उत्पादन ३५.०० क्विं./हे.) व प्रणीतरेड्डी नरसिंहरेड्डी मूल्यलवाड (उत्पादन ३५.०० क्विं./हे.) रा. किनी हे प्रथम व द्वितीय आले तर तूर या पिकात धर्माबाद तालुक्यातून दिगंबर शंकर कपाटे (उत्पादन ४३.८१ क्विं./हे.) व हणमंतराव मारोती वारले (उत्पादन ४१.५८ क्विं./हे.) हे अनुक्रमे प्रथम व द्वितीय आले आहेत. पीकस्पर्धेत विजेते शेतकऱ्यांना जिल्हास्तरावर क्रमशः प्रथम, द्वितीय व तृतीय यांना १० हजार ७ हजार व ५ हजार रुपये बक्षीस रक्कम देण्यात येणार आहे.

सर्व विजेत्या शेतकऱ्यांचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच खरीप हंगाम सन २०२६ पीक स्पर्धेसाठी जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेबाबत अधिक माहितीसाठी कृषी विभाग, महाराष्ट्र राज्य, संकेतस्थळ www.krishi.maharashtra.gov.in किंवा संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या पीक उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती, मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल या अनुषंगाने जिल्हा स्तरावर पीक स्पर्धा घेण्यात येत असल्याचे कृषी विभागाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

## चांगुणाबाई कऱ्हाळे यांचे निधन

**लोहा (प्रतिनिधी) –** अंतेश्वर येथील चांगुणाबाई रावण पाटील कऱ्हाळे यांचे रविवार, दि. २८ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे वय ६५ वर्षे होते. गोदाकाठावरील अंतेश्वर गावी त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



माजी सरपंच रावण पाटील यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, सहा दीर, जावा, १३ पुतणे, १० पुतण्या, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

## अख्खा टिप्पर पकडला; वाळू मात्र दोन ब्रास जप्त!

**नांदेड (प्रतिनिधी)–** उमरी पोलिसांनी वरिष्ठांच्या आदेशावरून आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळू वाहतूक करणारा एक टिप्पर पकडला. या टिप्परमध्ये केवळ दोन ब्रास वाळू आढळून आली. दोन ब्रास वाळू चार पोलिसांनी पकडल्याने जिल्ह्यात आश्चर्य व्यक्त होत आहे.

रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी स्वतः पीआय गुट्टे, पो.उप.नि. आरमळ असे हद्दीत रात्रगस्तीत चेकींग करीत असताना वाळूने भरलेला टिप्पर क्र. (MH26/D-9355) हा कौडगावकडून बळेगावकडे येत होता. टिप्पर जवळ येताच चालकास ताब्यात घेतले. बळेगाव येथे थांबवून टिप्परची पाहणी केली असता टिप्परमध्ये दोन ब्रास वाळू असल्याचे आढळून आले. सदर टिप्पर चालकास वाळू वाहतूक करण्याचा परवाना विचारला असता, त्याने परवाना नसल्याचे कळविले. त्यावरून दोन पंचांसमक्ष सदर टिप्पर जप्त करून चालक सदानंद परशुराम लंगोटे (वय २२ वर्षे, रा. सातेगाव ता. नायगाव जि. नांदेड) याचे विरुद्ध पो.स्टे. उमरी गु.र.नं. १६२/२०२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. २०२३ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

## नियमांचे उल्लंघन केल्यास खासगी शाळांवर कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील ९० टक्के खासगी शाळा महाराष्ट्र खासगी शाळा शुल्क नियमन अधिनियम २०११ चे सर्रास उल्लंघन करत असल्याच्या तक्रारीची दखल घेत जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने (प्राथमिक) सर्व शाळांना कडक इशारा दिला आहे. या नियमांची तंतोतंत अंमलबजावणी न करणाऱ्या शाळांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आदेश शिक्षणाधिकाऱ्यांनी निर्गमित केले आहेत.

नांदेड येथील समाजसेवक गौतम जैन यांनी १६ जून २०२६ रोजी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षण विभागाकडे एक सामूहिक तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनुसार जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक, नर्सरी आणि प्ले-ग्रुप स्तरावरील बहुतांश शाळा शुल्क नियमन कायद्याचे उल्लंघन करून पालकांची आर्थिक लूट करत असल्याचे समोर आले आहे. प्ले-ग्रुपसाठी डीएफआरसी मंजूर शुल्क १० हजार ते १५ हजार रुपये असताना, शाळा ४० हजार ते ६० हजार रुपयांची मागणी करत आहेत. एवढेच नव्हे तर साहित्याची सक्ती करुन शाळा स्वतःच गणवेश, पुस्तके आणि स्टेशनरी विकत असून ठराविक दुकानातूनच खरेदी करण्याची सक्तीही पालकांवर केली जात असल्याचे आढळून आले.

शिक्षण विभागाचे नियम धाब्यावर बसवत शाळेच्या नोटीस बोर्डवर मंजूर शुल्क संरचना न लावणे आणि पालक-शिक्षक संघाच्या नियमानुसार बैठका न घेणे, अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तसेच पूर्ण फी भरल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारला जात असून, डेव्हलपमेंट फी आणि डोनेशनच्या नावाखाली अतिरिक्त पैसे वसूल केले जात असल्याच्या तक्रारी आहेत.

या तक्रारीची गंभीर दखल घेत शिक्षण विभागाने २५ जून २०२६ रोजी परिपत्रक काढून सर्व खासगी शाळांना सूचित केले आहे की, शुल्क नियमन अधिनियम २०११ आणि सुधारित नियम २०१६ व २०१८ ची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांना त्यांच्या तालुक्यातील खासगी शाळांची तपासणी करून या नियमांचे पालन होत आहे की नाही याचा अहवाल तयार करून वरिष्ठ कार्यालयास कळवावा अशाही सूचना देण्यात आल्या आहेत.

## पिस्तूलसह एकाला अटक; गुन्हा दाखल



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत विनापरवाना बेकायदेशीररित्या पिस्तूल वापरत दहशत पसरवणारा गुन्हेगार इतवारा पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाच्या जाळ्यात अडकला. त्याच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमांवर व अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने इतवारा ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ यांच्या पथकाने कारवाई करत अवैध अग्निशस्त्र (पिस्तूल) बाळगणाऱ्या युवकास पकडून त्याच्याकडून शस्त्र जप्त करण्यात आले आहे.

सोमवार, दि. २९ जून रोजी रामेश्वर खनाळ हे आपल्या अन्य सहकाऱ्यांसोबत पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालीत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, संशयीत हर्ष जगदीश कोकरे, रा. भोई गल्ली चौफाळा याचे ताब्यात देशी बनावटीचे अवैध अग्निशस्त्र आहे. त्यावरुन पो.नि. खनाळ यांनी पो.स्टे. इतवारा येथील पथकास मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी तत्काळ रवाना केले असता हर्ष जगदीश कोकरे याला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे देशी बनावटीचे अग्निशस्त्र मिळून आले. त्यावरून दोन पंचांसमक्ष अग्निशस्त्र जप्त करून त्याचे विरुद्ध पो.स्टे. इतवारा गु.र.नं. २२८/२०२६ कलम ३/२५ भारतीय हत्यार कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## हदगाव तालुक्यात वटपौर्णिमा उत्साहात साजरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** हदगाव तालुक्यासह बरडशेवाळा, पळसा, मनाठा, पिंपरखेड, चिंचगव्हाण, बामणी फाटा परिसरात सोमवार, दि. २९ जून रोजी वटपौर्णिमेनिमित्त विवाहित महिलांनी वडाच्या झाडाची पूजा केली. यावेळी महिलांनी आपल्या पतीला दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य लाभावे आणि सुखी संसारासाठी पारंपरिक वेशभूषा परिधान करून वडाच्या झाडाला प्रदक्षिणा घालत, वडाला पवित्र धागा गुंडाळत वटपौर्णिमेनिमित्त भक्तिभावाने पूजा केली.



वटपौर्णिमेनिमित्त मंदिरे आणि सार्वजनिक ठिकाणी सकाळपासूनच महिलांची गर्दी पाहायला मिळाली. अनेक ठिकाणी सामाजिक संस्था आणि महिला मंडळांनी वटपौर्णिमेनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम तसेच वृक्षसंवर्धनाचा संदेश देणारे उपक्रम आयोजित करीत परिसरात वटपौर्णिमेनिमित्त ठिकठिकाणी विविध उपक्रम राबवून वटपौर्णिमा उत्साहात साजरी केली.

## घरात घुसून विनयभंग करणाऱ्या चौघांना तीन वर्षांची शिक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)–** जुन्या वादातून घरात घुसून वृद्ध दाम्पत्याला मारहाण करून एका युवतीचा विनयभंग केल्याप्रकरणी येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय-१ चे न्यायाधीश आर. व्ही. कोकरे यांनी चारही आरोपींना दोषी ठरवून विविध कलमांखाली तीन वर्षांपर्यंत सश्रम कारावास आणि दंडाची शिक्षा सुनावली आहे.

ही घटना १७ मे २०१९ रोजी घडली होती. पीडित तक्रारदार युवती आणि तिचे आजी- आजोबा घरात असताना, शेजारी राहणारे राजू गोविंद आडे, त्याची पत्नी लताबाई राजू आडे, मुलगा विशाल राजू आडे आणि मेहुणा राजा ऊर्फ राजेश देवराव जाधव यांनी तुम्ही आमच्याविरुद्ध पोलीस ठाण्यात वारंवार तक्रार का देता? या कारणावरून पीडितेच्या घरात बेकायदेशीर प्रवेश केला होता.

यावेळी आरोपींनी पीडितेच्या आजी-आजोबांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. पीडिता त्यांना सोडवण्यासाठी गेली असता, आरोपी विशाल राजू आडे याने तिचा हात धरून स्वतःकडे ओढले व तिचा विनयभंग करून अश्लील वर्तन केले. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला होता. सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील अॅड. रणजीत देशमुख यांनी मांडलेला युक्तिवाद आणि ५ महत्त्वाच्या साक्षीदारांची साक्ष ग्राह्य धरून न्यायालयाने वरील चारही आरोपींना तीन वर्षांची आणि रोख दहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

## मनपाच्या निवडणूक विभागातील संतोष जोशी सेवानिवृत्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेच्या निवडणूक विभागामध्ये कार्यरत वरिष्ठ लिपीक संतोष जोशी हे नियत वयोमानानुसार ३० जून रोजी सेवानिवृत्त होत आहेत.



जोशी यांनी लिपीक म्हणून २०१० ते २०२६ पर्यंतच्या निवडणुकीमध्ये काम केले आहे. तसेच लोकसभा व विधानसभा निवडणुकीत देखील काम केले आहे. दरम्यानच्या कालावधीत पार पडलेल्या पोटनिवडणुकीतही काम केले आहे. संबंधितांनी मनपाच्या विविध विभागात काम केलेले असून आपले कर्तव्य योग्यरित्या पार पाडले. तसेच निवडणूक कालावधीत त्या-त्या वेळेसच्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करुन व अथक परिश्रम घेऊन सर्व निवडणुकीमधील कामे चोखपणे व लीलया पार पाडले असून महापालिका निवडणूक कामी आपला स्वतंत्र असा ठसा उमटविला आहे.

जोशी हे मंगळवार, दि. ३० जून २०२६ रोजी नियत वयोमानानुसार मनपा सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या या सेवानिवृत्तीबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## चित्रकार नयन बाराहाते यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आज कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी) –** दिवंगत ज्येष्ठ चित्रकार नयन बाराहाते यांच्या कलात्मक कार्याचा जागर करण्यासाठी मंगळवार, दि. ३० जून २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता नांदेड येथील हॉटेल विसावा, शिवाजी नगर येथे विशेष स्मृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



या कार्यक्रमात ज्येष्ठ भाष्यकार व चित्रकार भ. मा. परसवळे यांना 'नयन बाराहाते चित्रकार स्मृती पुरस्कार २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे. यावेळी सेवाभाव, चित्रकला आणि आरोग्य या विषयांवर मान्यवरांचे विचारमंथनही आयोजित करण्यात आले असून, कला आणि समाजकारण यांचा परस्परसंबंध उलगडण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. सुरेश सावंत हे राहणार आहेत. प्रमुख उपस्थिती म्हणून ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अशोक बेलखोडे, सुप्रसिद्ध डॉक्टर व सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्र. दि. जोशी पाटोदेकर तसेच स्वा.रा.ती.म.वि. नांदेडच्या माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजेंद्र गोणारकर उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाचे आयोजन सायली नयन बाराहाते (सुजन कम्युनिकेशन्स, नयन प्रकाशन, मुंबई) यांच्या पुढाकाराने करण्यात आले असून, कला, साहित्य, पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



**नांदेड–**नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक २०२६ च्या निवडणुकीच्या जिल्ह्याच्या 'क' मतदार संघातून नामनिर्देशन पत्र दाखल करताना नांदेड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष दिलीपराव पाटील बेटमोगरेकर. यावेळी संजय रावणगावकर, लेबर फेडरेशनचे संचालक शौकत पठाण, मनोज गुट्टे, हौसाजी वाघमारे, शिवाजी कानोटे, चेअरमन राजू वालगोटेवाड, शंकर बामणवाड, समद काजी, सरपंच प्रतिनिधी संदीप घाटे तुपदाळकर यांच्यासह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते दिसत आहेत.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com